
• वर्ष : ०३ • अंक : ३२१ • पुणे • गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





विठ्ठलवाडी ते जयदेव नगर; विद्युत रोषणाईचे लोकार्पण

3



खडकवासला धरण चौकात ‘रास्ता रोको’

4

## शौर्य

(आरंभ पर्व)

भारत देशाची वाढवू आम्ही शान
देश रक्षणार्थ लावू पणाला प्राण

स्वातंत्र्यासाठी जे लढले
तळहाती घेऊनी प्राण
एकमुखाने गाऊ सारे
त्यांच्या शौर्याचे गुणगाण

स्वातंत्र्याप्राप्ती मार्ग अनेक जपले
अहिंसा, संघर्ष, त्याग, बलिदान
छातीवर जरी गोळी झेलली
कधी न झुकली ती वीर मान

मायभूचे साखळदंड तुटता मिळे
स्वातंत्र्य समता बंधुत्वाचे दान
भेदाभेद संपवू या रे
गाऊ सारे मानवतेच गाणं

सीमारक्षणा लडले वीर जवान
किसान पिकवतो कष्टाने रान
देश गौरविण्या एक होऊन
पराक्रम कष्टाचा करु सन्मान

जल, जमीन, जंगल गिळण्या
एकवटले सारे हैवान
वसुंधरेच्या संरक्षणासाठी
आता पेटवू सारे रान

संविधान मुल्य घाव सोसती
धर्माधर्मात नको भांडण
कधी ना मोडू जुट एकटेची
देश असे प्राण तिरंगाचा अभिमान

भारत देशाची वाढवू आम्ही शान
देश रक्षणार्थ लावू पणाला प्राण

*- विठ्ठल वळसे पाटील*
*पुणे - ८४८४०६६०४२*

# एलिव्हेटेड कॉरिडॉरची निविदा १५ दिवसांत

## खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या भेटीनंतर नितीन गडकरींचे संबंधित विभागाला तातडीने निर्देश

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

नाशिक फाटा ते राजगुरुनगर एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या निविदा प्रक्रियेला येत्या १५ दिवसांत सुरुवात होणार असून, त्यानंतर प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली जाणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निविदा प्रक्रिया तातडीने राबविण्याचे निर्देश दिल्याची माहिती शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी दिली.

डॉ. अमोल कोल्हे यांनी नवी दिल्ली येथे नितीन गडकरी यांची भेट घेऊन शिरूर लोकसभा मतदारसंघातील रस्ते व दळणवळणाशी संबंधित विविध प्रश्नांवर चर्चा केली. यावेळी नाशिक फाटा ते राजगुरुनगर या उन्नत मार्गाच्या कामाला गती देण्याची मागणी त्यांनी केली. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या सुमारे १० हेक्टर जमिनीपैकी पीएमआरडीए क्षेत्रातील ६.९१ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनासाठी निधी उपलब्ध झाला आहे. तर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील ३.८१ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनासाठी पुढील १५ दिवसांत निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे गडकरी यांनी सांगितले. शंभर टक्के भूसंपादन झाल्याशिवाय प्रकल्प सुरू करता येणार नाही, या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे प्रकल्पाला विलंब होत असल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. यानंतर नितीन गडकरी यांनी स्वतः पुणे जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून प्रकल्पाच्या सद्यस्थितीची माहिती घेतली आणि भूसंपादन प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश दिले. मंचर आणि कळंब बायपास परिसरातील अपघातप्रवण ठिकाणी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी लवकरात लवकर भुयारी मार्ग आणि सेवा रस्ता उभारण्याची मागणीही डॉ. अमोल कोल्हे यांनी गडकरी यांच्याकडे केली. दरम्यान, एमएसआयडीसीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या तळेगाव-चाकण-शिक्रापूर, हडपसर-यवत आणि पुणे-शिरूर महामार्गांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या रस्त्यांवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, खड्ड्यांमुळे गंभीर अपघात होऊन अनेकांना जीव गमवावा लागल्याचे कोल्हे यांनी गडकरी यांच्या निदर्शनास आणून दिले. या तक्रारीची दखल घेत गडकरी यांनी एमएसआयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक ब्रजेश दीक्षित यांना संबंधित रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या.



### मंचर-कळंब बायपासवर भुयारी मार्गाची मागणी

## दगडूशेठ गणपती मंदिराच्या विस्ताराचा मार्ग मोकळा!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहराचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराच्या विस्तारासाठी फरासखाना-विश्रामबाग पोलीस ठाण्याची सध्याची जागा उपलब्ध करून देण्याच्या हालचालींना वेग आला आहे. पुणे पोलिसांनी या जागेच्या हस्तांतरणाला तत्त्वतः ना-हरकत दर्शविली असून, यासंदर्भातील प्रस्ताव गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांकडे पाठविण्यात आला आहे. मात्र, पोलीस ठाण्याची सध्याची जागा तातडीने दगडूशेठ गणपती ट्रस्टच्या ताब्यात दिली जाणार नाही. पोलिसांसाठी बुधवार पेठेत नवीन अत्याधुनिक पोलीस संकुल उभारल्यानंतरच स्थलांतराची प्रक्रिया पूर्ण करून सध्याची जागा ट्रस्टकडे हस्तांतरित केली जाणार आहे.



दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावरील फरासखाना-विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या इमारतीत सध्या पुणे पोलिसांच्या पश्चिम विभागाचे मुख्यालय, अतिरिक्त पोलीस आयुक्तांचे कार्यालय, परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त, सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक विभाग तसेच फरासखाना-विश्रामबाग पोलीस ठाण्याचे कामकाज सुरू आहे. १९७६-७७ मध्ये उभारण्यात आलेल्या या इमारतीची जागा दगडूशेठ गणपती मंदिराला लागून असल्याने मंदिर विस्तारासाठी ती महत्त्वाची मानली जात आहे.


दगडूशेठ गणपती मंदिरात वर्षभर भाविकांची मोठी गर्दी असते. संकष्टी चतुर्थी, अंगारक चतुर्थी तसेच गणेशोत्सवाच्या काळात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे मंदिर परिसराचा विस्तार करून भाविकांसाठी अधिक सुविधा निर्माण करण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे.

## इंदापुरातील ग्रामपंचायतींना प्रशासक राज; विकासकामांना ‘ब्रेक’

**इंदापूर (दै. आरंभ पर्व)**

तालुक्यातील तब्बल ८१ ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्यात आल्याने गावगाड्याच्या विकासकामांना मोठा ‘ब्रेक’ लागला आहे. यातील २० ग्रामपंचायतींचा कारभार विस्तार अधिकाऱ्यांकडे, तर उर्वरित ६१ ग्रामपंचायतींची जबाबदारी संबंधित गावच्या सरपंचांकडे सोपविण्यात आल्याची माहिती आहे. प्रशासकांना दैनंदिन गरजेपुरता खर्च करण्याचे मर्यादित अधिकार असल्याने नवीन विकासकामांच्या निविदा, कार्यादेश तसेच जुन्या कामांच्या देयकांवरही परिणाम झाला आहे. इंदापूर तालुक्यात ग्रामपंचायतींच्या माध्यमातून रस्ते, गटारे, पाणीपुरवठा, पथदिवे आणि विविध सार्वजनिक सुविधा पुरविण्याची कामे केली जातात. मात्र लोकनियुक्त सरपंच व सदस्यांचा कार्यकाळ संपल्याने गावातील समस्या प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविणारी लोकप्रतिनिधींची यंत्रणा अनेक ठिकाणी उपलब्ध नाही. पाणीपुरवठा, वीजबिले, अत्यावश्यक स्वच्छता आणि कर्मचारी वेतन यांसारख्या बाबींवर खर्च करता येत असला, तरी नवीन विकासकामांच्या निविदा काढणे, कार्यादेश देणे आणि जुन्या कामांची बिले काढण्यावर मर्यादा असल्याने विकासकामे रखडली आहेत. पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे, वीजबिले भरणे, अत्यावश्यक स्वच्छता आणि कर्मचाऱ्यांचे वेतन यांना प्रशासकांकडून प्राधान्य दिले जात आहे. मात्र अंतर्गत रस्ते, गटारे, पथदिवे, पाणीपुरवठा योजना आणि सार्वजनिक ठिकाणांच्या दुरुस्तीची मोठी कामे मार्गी लावण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे ‘पद मोठे; पण अधिकार छोटे’ अशी प्रशासकांची अवस्था झाली आहे.

# संततधार पावसामुळे शेतीची कामे खोळंबली



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे शेतकऱ्यांची शेतीची कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतांमध्ये मोठ्या प्रमाणावर चिखल साठला असून ट्रॅक्टरसह इतर कृषी अवजारे चालविणे शक्य होत नाहीत. परिणामी सोयाबीन, वाटाना, बटाटा तसेच विविध भाजीपाला पिकांची लागवड मोठ्या प्रमाणावर खोळंबली आहे.

यंदा जुलैमध्ये सुरू झालेल्या दमदार पावसामुळे जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाला असला, तरी आता अतिवृष्टीमुळे शेतात मशागतीची कामे करणे कठीण झाले आहे. अनेक ठिकाणी पाणी साचल्याने शेतात जाता येत नाही. त्यातून रस्त्याच्या कडेला शेती असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतजमींमध्ये रस्त्याचेही पाणी थेट वाहून येते. आणि साठून राहत आहे. त्यामुळे लागवडीची योग्य वेळ हातातून निसटत असल्याची चिंता येथील शेतकरी व्यक्त करत आहेत. दररोज रात्रंदिवस पावसाची हजेरी लागत असल्याने शेतकरी पाऊस उघडण्याची प्रतीक्षा करत आहेत. पावसाचे सातत्य कायम असल्याने शेतीची सर्व कामे रखडली असून आगामी उत्पादनावरही त्याचा परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

हवामान अनुकूल होताच लागवडीची कामे वेगाने पूर्ण करण्यासाठी शेतकरी तयारीत आहेत. मात्र, आणखी काही दिवस अशीच परिस्थिती राहिल्यास खरीप हंगामाचे नियोजन कोलमडून जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### लागवड खोळंबली

सतत पाऊस सुरू असल्याने शेतात ट्रॅक्टर उतरविणे शक्य होत नाही. सोयाबीन, वाटाणा, बटाटा आणि भाजीपाला लागवड पूर्णपणे खोळंबली आहे. आता पाऊस उघडण्याचीच आम्ही आतुरतेने वाट पाहत आहोत. पावसाने किमान आठवडाभर उघडीप दिल्यास शेतात काम करणे शक्य होईल. **- रामनाथ होले, शेतकरी, मांडवळा - खरपुडी.**

## ठळक बातम्या

### दुसरी मुलगी झाल्यास सहा हजार

बारामती (आरंभ पर्व) : प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेच्या विशेष नोंदणी मोहिमेच्या माध्यमातून, राज्यात महिलांच्या आणि बालकांच्या आरोग्यात सुधारण्याची आशा आहे. बारामतीतील ६४३ महिलांच्या नोंदणीनंतर प्रशासनाने ही योजना यशस्वीपणे राबविण्याचे श्रेय घेतले आहे. या योजनेसह गर्भवती महिला आणि स्तनदा मातांना योग्य आहार उपलब्ध करण्यात येतो, तसेच माता व बालकांचे आरोग्य सुधारावे आणि कुपोषण कमी व्हावे यासाठी प्रयत्न केले जात आहेत. पहिल्या अपत्यासाठी ५ हजार रुपये, तर दुसऱ्या अपत्याच्या बाबतीत मुलगी असल्यास ६ हजार रुपयांची आर्थिक मदत प्रदान केली जाते. बारामती तालुक्यातील १५ बीटमधील १०० ग्रामपंचायतीत एप्रिल ते जुलै २०२६ या कालावधीत ६४३ महिलांची नोंदणी करण्यात आली आहे, ज्यामुळे कोणतीही पात्र महिला या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही यासाठी प्रशासनाच्या पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. मातृवंदना योजना केंद्र पुरस्कृत आहे, ज्यामुळे गर्भवती महिलांना आहार आणि आरोग्यसेवा घेण्यासाठी प्रवृत्त केले जाते. ही योजना १ जानेवारी २०१७ पासून चालू आहे. पहिल्या अपत्याचे आर्थिक सहाय्य मिळविण्यासाठी महिलांना गर्भधारणेची नोंदणी व तपासणी करावी लागते. दुसऱ्या अपत्याच्या बाबतीत मुलगी असल्यास ६ हजार रुपये एकरकमी दिले जातात.

# महापौर महिला आरोग्य अभियानाचा दिमाखात शुभारंभ

'निरोगी सखी राहील सुखी' उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; पहिल्याच शिबिरात १,७५६ महिलांची आरोग्य तपासणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महिलांचे आरोग्य सुदृढ राहावे, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा प्रत्येक महिलांपर्यंत पोहोचावी आणि आरोग्याबाबत जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून महापालिकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या 'महापौर महिला आरोग्य अभियानाचा' शुभारंभ शुक्रवारी सिंहगड रस्त्यावरील सर्वे क्रमांक १३०, दांडेकर पूल परिसरात राज्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते झाला. या अभियानाच्या पहिल्याच शिबिरात १,७५६ महिलांनी विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि भारतमाता यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी मार्गदर्शन करताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, "महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेले 'महापौर महिला आरोग्य अभियान' हा लोकाभिमुख आणि समाजोपयोगी उपक्रम आहे. महिलांचे आरोग्य जपणे ही काळाची गरज असून अशा प्रकारचे अभियान शहरातील प्रत्येक भागात राबविणे आवश्यक आहे. महिलांपर्यंत वेळेवर आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी आणि त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरेल. या अभियानाचा अधिकाधिक महिलांनी लाभ घ्यावा."

महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून आयोजित या मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिराला परिसरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पहिल्याच शिबिरात १,७५६ महिलांनी विविध आरोग्य तपासण्या करून घेतल्या.

या अभियानाद्वारे महिलांना प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, नियमित आरोग्य तपासणी, आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन आणि आरोग्यविषयक जनजागृती उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. हे अभियान केवळ एका दिवसापुरते मर्यादित नसून वर्षभर शहरातील विविध प्रभागांमध्ये टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे. पुढील शिबिरांचे वेळापत्रक आणि स्थळांची माहिती लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, महापालिकेचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी तसेच परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



## थोडक्यात पण महत्वाचे



### येवलेवाडीतील गरजू विद्यार्थ्यांना सारथी फाउंडेशनकडून रेनकोट वाटप

पुणे, येवलेवाडी (आरंभ पर्व) : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गरीब व गरजू विद्यार्थ्यांना पावसापासून संरक्षण मिळावे आणि त्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, या सामाजिक बांधिलकीतून सारथी रुग्णहक्क जनसेवा ट्रस्ट, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा विद्यालय, येवलेवाडी येथील विद्यार्थ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह पाहायला मिळाला. रेनकोट मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त करत संस्थेचे आभार मानले. आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना पावसाळ्यात शाळेत ये-जा करताना अडचणी येऊ नयेत, तसेच त्यांचे शिक्षण सुरळीत सुरू राहावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी सारथी फाउंडेशनचे उपाध्यक्ष योगेश शेवाळे, कुलदीप नाईकनवरे, सारिका लोणकर, आकाश झांबरे, सागर जगताप, हरिभाऊ दळवी, पद्मजा गव्हाणे, आकाश कोळी, सागर कारंडे व राहुल नाईक यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. मनपा शाळा येवलेवाडी क्र. १ च्या मुख्याध्यापिका कविता जाधव यांनी सारथी फाउंडेशनच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करून संस्थेचे आभार मानले. तसेच मनपा शाळा क्र. २ च्या रेखा चव्हाण, धनंजय मोरे, दत्ता कोडग, धनाजी मोरे, हर्षद कांबळे, मनीषा गुट्टे यांच्यासह शाळेतील शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. "गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे," या भावनेतून सारथी रुग्णहक्क जनसेवा ट्रस्टच्या वतीने राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरला. सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून गरजू घटकांना मदतीचा हात देण्याचे कार्य यापुढेही सुरू ठेवण्याचा संस्थेचा मानस आहे.

### खडकवासला, नांदोशी, धायरीतील पाणीपुरवठा योजनांना मिळणार गती

- पाण्याच्या टाक्यांसाठी जागा खरेदीची प्रक्रिया सुरू; ३२ गावांतील प्रस्तावित योजनांना दिलासा

खडकवासला (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या ३२ गावांमधील प्रस्तावित पाणीपुरवठा योजनांना आता गती मिळण्याची शक्यता आहे. या योजनांसाठी पाण्याच्या टाक्या उभारण्याकरिता आवश्यक जागा खरेदी करण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुरू केली आहे. यासाठी पाणीपुरवठा विभागाने जाहिरात प्रसिद्ध करून संबंधित गावांतील जागामालकांकडून प्रस्ताव मागविले आहेत. या प्रक्रियेमुळे खडकवासला, किरेकटवाडी, धायरी, नांदोशी, नऱ्हे आदी गावांमधील पाणीपुरवठा योजनांना गती मिळणार असल्याचे नगरसेविका धनश्री कोल्हे यांनी सांगितले. पाण्याच्या टाक्या उभारण्यासाठी आवश्यक जागांची गरज असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. पाणीपुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी योग्य ठिकाणी जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित जागामालकांनी स्वेच्छेने आपले प्रस्ताव महापालिकेकडे सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. प्राप्त प्रस्तावांची तांत्रिकदृष्ट्या योग्य-अयोग्यता तपासल्यानंतर नियमानुसार जागा खरेदीची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नगरसेविका धनश्री कोल्हे म्हणाल्या की, समाविष्ट गावांमध्ये पाणीपुरवठ्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून गंभीर आहे. पाण्याच्या टाक्यांसाठी जागा उपलब्ध करून घेण्याची प्रक्रिया सुरू होणे ही सकारात्मक बाब आहे. जागा खरेदी झाल्यानंतर लवकरच नवीन पाण्याच्या टाक्यांच्या कामाला सुरुवात होण्यास मदत होईल. या प्रक्रियेमुळे खडकवासला परिसरातील नागरिकांना भविष्यात नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

### सुंदरम फायनान्सची सदस्य कर्जदाता संस्था म्हणून नोंदणी



पुणे (आरंभ पर्व) : सुंदरम फायनान्स लिमिटेडची सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठीच्या पतहमी निधी न्यासाच्या (सीजीटीएमएसई) अंतर्गत सदस्य कर्जदाता संस्था म्हणून नोंदणी करण्यात आली आहे. या नोंदणीमुळे पात्र सूक्ष्म आणि लघु उद्योगांना सुंदरम फायनान्समार्फत भारत सरकारच्या पतहमीच्या पाठबळासह वित्तपुरवठा उपलब्ध होणार आहे. सीजीटीएमएसईसोबतच्या या भागीदारीमुळे पुरेसे तारण नसले, तरी व्यवहार्य व्यावसायिक संधी असलेल्या पात्र सूक्ष्म आणि लघु उद्योगांना औपचारिक कर्जसुविधा मिळण्यास मदत होणार आहे. या माध्यमातून व्यवसाय विस्तार, कार्यकारी भांडवलाच्या गरजा आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. याबाबत सुंदरम फायनान्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक राजीव लोचन म्हणाले, "सुंदरम फायनान्समध्ये आमचे ध्येय उद्योग आणि समाजाच्या प्रगतीला सक्षम करून दीर्घकालीन मूल्य निर्माण करणे हे आहे. सीजीटीएमएसईसोबतच्या सहकार्याद्वारे आम्ही विशेषतः कमी सेवा मिळालेल्या सूक्ष्म आणि लघु उद्योगांना जबाबदार आणि सर्वसमावेशक वित्तपुरवठा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत आहोत."


# श्रीमान लेजेंडकडून १२ लाखांची मदत

## महाराष्ट्राची बांधिलकी आसामच्या मदतीला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्राची ओळख केवळ पराक्रम, कष्ट आणि संघर्षाची नाही, तर संकटाच्या काळात माणुसकीसाठी उभे राहण्याचीही आहे. हीच महाराष्ट्राची 'बांधिलकी' पुन्हा एकदा देशासमोर आली आहे. आसाममधील भीषण महापुरामुळे संकटात सापडलेल्या कुटुंबांसाठी 'श्रीमान लेजेंड' आणि 'बांधिलकी परिवाराच्या' माध्यमातून तब्बल १२ लाख रुपयांची मदत उभी करण्यात आली आहे.

श्रीमान लेजेंड हे गेमिंग आणि लाइव्ह स्ट्रीमिंगच्या माध्यमातून ओळखले जाणारे लोकप्रिय गेमिंग यूट्यूबर आहेत. गेमिंग हे त्यांचे प्रमुख क्षेत्र असले, तरी गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी आपल्या या व्यासपीठाचा उपयोग सामाजिक कार्यासाठीही केला आहे. मनोरंजन आणि गेमिंगपुरते व्यासपीठ मर्यादित न ठेवता गरजूंसाठी मदतीचा हात पुढे करण्याची भूमिका त्यांनी सातत्याने घेतली आहे. आसाममधील भीषण महापुरामुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले. घरे, घरातील साहित्य आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे मोठे नुकसान झाले. ही परिस्थिती समोर आल्यानंतर श्रीमान लेजेंड यांनी लाइव्ह स्ट्रीमिंगच्या माध्यमातून चॅरिटी सुरू केली. तब्बल आठ तास चाललेल्या या लाइव्ह चॅरिटीमधून १० लाख रुपयांचा निधी जमा झाला. चॅरिटी संपल्यानंतरही मदतीची भावना कायम राहिली. दुसऱ्या दिवशी अनेक चाहते आणि समर्थक स्वतःहून पुढे आले आणि त्यांनी आणखी आर्थिक योगदान दिले. या अतिरिक्त योगदानासोबतच श्रीमान लेजेंड यांनी स्वतःकडूनही काही रक्कम जोडली. अशा प्रकारे आसामच्या पूरग्रस्तांसाठीची एकूण मदत १२ लाख रुपयांपर्यंत पोहोचली. ही मदत 'Sikh Aid' या संस्थेच्या माध्यमातून गरजूंपर्यंत पोहोचली असून, संस्थेकडून मदतीचे वाटप सुरू झाले आहे. आसाममधील सुमारे २०० पूरग्रस्त कुटुंबांना गाद्या, गॅस शेगड्या, स्वयंपाकाची भांडी आणि इतर जीवनावश्यक वस्तू देण्यात येत आहेत. मदतीचे साहित्य संबंधित भागात पोहोचले असून, संस्थेच्या माध्यमातून त्याचे वितरण सुरू झाले आहे. याशिवाय पूरग्रस्त भागातील एका संपूर्ण गावातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारीही



घेण्यात आली आहे. या मुलांच्या शालेय शुल्कासोबत गणवेश, स्कूल बॅग आणि आवश्यक शैक्षणिक साहित्य देण्याचे कामही संस्थेच्या माध्यमातून सुरू झाले आहे. त्यामुळे ही मदत केवळ आजच्या संकटापुरती मर्यादित न राहता, मुलांच्या भविष्यासाठीही आधार ठरणार आहे.

आसाममधील नटालीगुरी भागात महापुरामुळे पूर्णपणे उद्ध्वस्त झालेली १० घरे दत्तक घेऊन त्यांचे पुनर्निर्माण करण्याचे कामही सुरू झाले आहे. या दहा कुटुंबांना नवीन बेड, गाद्या आणि आवश्यक घरगुती वस्तू देण्यात येत आहेत. घरांचे पुनर्निर्माण करून ती पुन्हा राहण्यायोग्य करण्याचे काम संस्थेकडून सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे पुरामुळे उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांना पुन्हा आपल्या घरात उभे राहण्याची नवी आशा मिळत आहे.

श्रीमान लेजेंड यांचे सामाजिक कार्य केवळ आसामपुरते मर्यादित नाही. कोल्हापूर, सांगली तसेच महाराष्ट्रातील विविध पूरग्रस्त भागांमध्ये आणि महाराष्ट्राबाहेरील पूरग्रस्त भागांमध्येही त्यांनी मदतीचा हात पुढे केला आहे. कोविडच्या काळात, सैन्यासाठी तसेच गरजू महिला, मुले आणि अनाथाश्रमांसाठीही त्यांनी विविध माध्यमांतून मदत केली आहे. काही वेळा त्यांनी ही मदत कोणताही गाजावाजा न करता केली आहे. मदतीची प्रसिद्धी होण्यापेक्षा ती योग्य गरजूंपर्यंत पोहोचावी, हा त्यामागचा उद्देश राहिला आहे.

> श्रीमान लेजेंड यांच्या या कार्यातून प्रेरणा घेत अनेक गेमिंग यूट्यूबर्स आणि स्ट्रीमर्सही सामाजिक मदतीसाठी पुढे येत आहेत. गेमिंगच्या माध्यमातून मिळालेली लोकप्रियता समाजासाठीही उपयोगी ठरू शकते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले आहे. आसामसाठीची ही १२ लाखांची मदत केवळ आर्थिक योगदान नाही, तर संकटात सापडलेल्या कुटुंबांना पुन्हा उभे करण्याची 'बांधिलकी' आहे. महाराष्ट्राची ही माणुसकीची परंपरा श्रीमान लेजेंड यांनी पुन्हा एकदा देशासमोर आणली आहे.

## बार्टी अधिछात्रवृत्ती प्रश्नावर मंत्रालयात संयुक्त बैठक



- विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्याचे आश्वासन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) अंतर्गत पीएच. डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या प्रलंबित अधिछात्रवृत्तीच्या मागण्यांसाठी 'आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन' आणि अधिछात्रवृत्तीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने आज पुणे येथील शासकीय विश्रामगृहात सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांची भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळाने विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन मंत्री शिरसाठ यांना सादर केले. या भेटीदरम्यान मंत्री संजय शिरसाठ यांनी अधिछात्रवृत्तीसाठी अर्ज केलेले विद्यार्थी, संशोधक तसेच विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा केली.

विद्यार्थ्यांच्या मागण्यांमागील तांत्रिक व व्यावहारिक अडचणी समजून घेत त्यांनी संबंधित विषयाची माहिती घेतली. बार्टीच्या केवळ १०० अधिछात्रवृत्तीच्या जागांमुळे मोठ्या संख्येने पात्र विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याचा मुद्दा शिष्टमंडळाने उपस्थित केला. तसेच ३५ वर्षांच्या वयोमर्यादेच्या अटीमुळे अनेक विद्यार्थ्यांना संशोधनाच्या संधीपासून वंचित राहावे लागत असल्याचेही मंत्री शिरसाठ यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

## ज्योतिबाची वाडी ग्रामपंचायतच्या बंद व मुदत संपलेल्या ग्रामपंचायत गाळ्यांचा नव्याने लिलाव करण्याची मागणी

### नागेश चव्हाण यांचा प्रशासनाला इशारा; १५ ऑगस्टपूर्वी कार्यवाहीची मागणी



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

जवळगाव क्रमांक २ (ज्योतिबाची वाडी) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील अनेक वर्षांपासून बंद असलेले तसेच ज्या गाळ्यांच्या लिलावाची मुदत संपली आहे, अशा गाळ्यांचा नव्याने सार्वजनिक लिलाव करण्याची मागणी सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस सरचिटणीस नागेश अभिमन्यू चव्हाण यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव, ग्रामविकास व महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच सोलापूर जिल्हा प्रशासनाला निवेदन दिले आहे. निवेदनानुसार, ग्रामपंचायत हद्दीतील काही गाळे व्यावसायिक वापरासाठी बांधण्यात आले असले तरी ते अनेक दिवसांपासून बंद आहेत. काही गाळ्यांचा मागील अनेक वर्षांपासून लिलाव झालेला नसून, पूर्वी लिलाव झालेल्या काही गाळ्यांच्या भाडे व डिपॉझिटची रक्कमही संबंधितांकडून अद्याप जमा करण्यात आलेली नसल्याचा आरोप चव्हाण यांनी केला आहे. गाळे बंद राहिल्यामुळे ग्रामपंचायतीचे आर्थिक नुकसान होत असून, शासनाच्या मालमत्तेचीही देखभाल होत नसल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. तसेच स्थानिक सुशिक्षित बेरोजगार तरुण आणि लघु व्यावसायिकांना व्यवसायासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने त्यांच्यावरही अन्याय होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

यापूर्वी गाळे भाड्याने घेतलेल्या मात्र मुदत संपल्यानंतर भाडे किंवा डिपॉझिट न भरलेल्या व्यक्तींना पुन्हा गाळे देऊ नयेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. नवीन लिलावासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून (PWD) चालू बाजारभावानुसार मूल्यांकन करून घेऊन, जिल्हा परिषदेच्या मंजुरीने पारदर्शक पद्धतीने सार्वजनिक लिलाव प्रक्रिया राबवावी, अशी मागणी चव्हाण यांनी केली आहे.

१५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या पुढील मासिक सभेत गाळ्यांच्या नव्या लिलावाचा विषय मंजुरीसाठी ठेवावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ होऊन स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असा दावा चव्हाण यांनी केला आहे. दरम्यान, मागील २४ डिसेंबर २०२५ रोजी याच विषयासंदर्भात तक्रार अर्ज दिला होता. मात्र, त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. १५ ऑगस्ट ते २० ऑगस्टदरम्यान प्रशासनाने योग्य ती कार्यवाही न केल्यास मुंबईतील आझाद मैदान, पुणे विभागीय आयुक्त कार्यालय, सोलापूर जिल्हा परिषद, बार्शी पंचायत समिती अथवा ज्योतिबाची वाडी ग्रामपंचायत कार्यालय यापैकी कोणत्याही ठिकाणी आत्मदहन करण्याचा इशारा चव्हाण यांनी निवेदनातून दिला आहे.

> या प्रकरणी प्रशासनाने तातडीने दखल घेऊन ग्रामपंचायत गाळ्यांची पाहणी, थकीत भाडे व डिपॉझिटची वसुली, मालमत्तेचे मूल्यांकन आणि नियमानुसार नव्याने लिलाव प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## पुण्यात ५ वी इंडिपेंडन्स कप तायक्वांदो चॅम्पियनशिप उत्साहात संपन्न

### महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील तायक्वांदो खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इंडिपेंडन्स तायक्वांदो ऑर्गनायझेशन, पुणे यांच्या वतीने आयोजित ५ वी इंडिपेंडन्स कप तायक्वांदो चॅम्पियनशिप २०२६ ही भव्य तायक्वांदो स्पर्धा ९ ऑगस्ट २०२६ रोजी शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथील बॉक्सिंग हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने तायक्वांदो खेळाडूंनी सहभाग घेतला. क्योरुगी आणि पूमसे या दोन्ही प्रकारांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, शिस्त आणि क्रीडाभावनेचे दर्शन घडविले.

स्पर्धेत Freshers तसेच Regular खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळाली. लहान वयोगटापासून विविध वयोगटातील मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्पर्धेची रंगत वाढवली.

स्पर्धेच्या अंतिम निकालात UK's Taekwondo Academy, Pune संघाने प्रथम क्रमांक पटकावला. MIT Taekwondo (Konark Taekwondo Academy) संघाने द्वितीय तर Mulshi Taekwondo संघाने तृतीय क्रमांक मिळविला.

प्रथम उपविजेता – Sangli District

द्वितीय उपविजेता – Lions Taekwondo Academy

तृतीय उपविजेता – MBTA Taekwondo Academy

याशिवाय Best Team Award – Solapur District तर Best Performance Award – Raigad District यांना प्रदान करण्यात आला.

स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना पदके, प्रमाणपत्रे व चषक देऊन गौरविण्यात आले. खेळाडूंना उत्कृष्ट व्यासपीठ उपलब्ध करून देत स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विविध प्रशिक्षक, रेफरी, पालक, स्वयंसेवक आणि आयोजकांनी मोलाचे सहकार्य केले.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राहुल भवाळ आणि कौस्तुभ मुंगसे यांनी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या नियोजनातून आणि सर्व प्रशिक्षक व पंचांच्या सहकार्याने स्पर्धा शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

"खेळातून शिस्त, शिस्तीतून आत्मविश्वास आणि आत्मविश्वासातून विजय!" या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला खेळाडू, प्रशिक्षक व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## फ्रेंडशिप डे निमित्त १०० हून अधिक पोर्शे कार्सचा मुंबईत शानदार ड्राइव्ह




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

फ्रेंडशिप डे निमित्त मुंबईत मोटारप्रेम आणि वाहन चालविण्याच्या उत्साहाचे शानदार दर्शन घडले. पोर्शे सेंटर मुंबई – इन्फिनिटी कार्सतर्फे ग्राहकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष ड्राइव्हमध्ये पोर्शेच्या १०० हून अधिक कार्सनी सहभाग घेतला.

पोर्शेच्या एसयूव्ही, स्पोर्ट्स कार्स तसेच विद्युत कार्सचा या ताफ्यात समावेश होता. पोर्शे मालक आणि त्यांच्या कुटुंबीयांना एकत्र आणणाऱ्या या उपक्रमातून मैत्री, आपुलकी आणि वाहन चालविण्याची समान आवड यांचा उत्सव साजरा करण्यात आला. या ताफ्याने मुंबईतील कोस्टल रोड आणि मरीन ड्राइव्ह यांसारख्या प्रतिष्ठित मार्गांवरून प्रवास केला. १०० हून अधिक पोर्शे कार्स एकत्रितपणे शहरातून मार्गक्रमण करत असल्याने मुंबईकरांना आकर्षक दृश्य अनुभवायला मिळाले. या ड्राइव्हमुळे पोर्शे मालकांना आपल्या कारमधून मुंबईचा अनुभव घेण्यासोबतच पोर्शे समुदायातील इतर सदस्यांशी संवाद साधण्याची आणि नवीन नाती जोडण्याची संधी मिळाली. या उपक्रमाबद्दल पोर्शे सेंटर मुंबई – इन्फिनिटी कार्सच्या संचालक पूजा चौधरी म्हणाल्या, "फ्रेंडशिप डेने आमच्या पोर्शे समुदायाला एकत्र आणण्याची आणि आमच्या ग्राहकांना जोडणाऱ्या सामायिक आवडीचा उत्सव साजरा करण्याची सुंदर संधी दिली. मुंबईत १०० हून अधिक पोर्शे कार्सना एकत्र पाहणे हे आमच्या समुदायातील मजबूत सौहार्द आणि आपुलकीचे प्रतीक होते.

# दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत आखाड कार्यक्रम व साहित्याचे वाटप





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लुंबिनी एज्युकेशनल व चॅरिटेबल ट्रस्ट वतीने दिव्यांग मुलांसाठी वह्या, पुस्तके व विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. दिव्यांग मुलांना शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध व्हावीत आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, या सामाजिक भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी दिव्यांग मुलांसोबत संवाद साधत त्यांचा उत्साह वाढविण्याचा आनंद मिळाला. तसेच आखाड साजरा करत दिव्यांग मुलांसाठी पौष्टिक मांसाहारी जेवणाची व्यवस्था करण्यात आली आणि स्वतः जेवण वाढून देण्याचा आनंद मिळाला. शिक्षणासोबतच त्यांच्या आरोग्याची आणि पोषणाची काळजी घेणे हीदेखील आपली सामाजिक जबाबदारी आहे. दिव्यांग मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अशा उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देत राहू अशी ग्वाही यावेळी दिली व सदर केंद्र सर्वतोपरी सहकार्य व मदत करण्याचे आश्वासन यावेळी मी दिले. सदर कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र समाज भूषण पुरस्कार विजेते श्री बाळासाहेब चव्हाण (मामा) यांनी केले होते सदर कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते सुजितअप्पा यादव,नगरसेवक निलेशजी आल्हाट, माजी नगरसेवक सुजित यादव, प्रबुद्ध भारत संस्थेचे नितीन भाऊ कांबळे, ॲड mविशाल सोनवणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते सदर कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी अजयभाऊ अहिरे व उत्तममामा अडसूळ यांनी विशेष प्रयत्न केले . यावेळी शासकीय बहुउद्देशीय दिव्यांग संमिश्र केंद्र येरवडा पुणे च्या अधीक्षक श्रीमती रोहिणी मोरे यांनी सर्व पाहुण्यांचे सत्कार केले तर श्रीमती कुमावत सरोदे विशेष शिक्षिका यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाचे विशेष व महत्त्व लक्षात घेऊन मी मळवली येथून वर्षाविहाराचा कार्यक्रम अर्धवट टाकून डायरेक्ट येरवड्यात सदर कार्यक्रमास उपस्थित राहिलो.

## युवा लहुजी संघर्ष सेनेतर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला परिसरात युवा लहुजी संघर्ष सेनेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १२६ वी जयंती विविध सामाजिक व प्रबोधनात्मक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. युवा लहुजी संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण तांदळे यांच्या नेतृत्वाखाली हा भव्य जयंती सोहळा पार पडला. जयंतीनिमित्त नागरिकांसाठी मोफत डोळे तपासणी व मोतीबिंदू तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा १६१ नागरिकांनी लाभ घेतला. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रबोधनात्मक व चरित्रात्मक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रा. डॉ. सुहास नाईक आणि विश्वजीत मोरे यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

यानंतर जे.पी. नगर ते कोल्हेवाडी फाटा, सिंहगड रोड या मार्गावर भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रात्री उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी नांदेड सिटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस, दत्ताभाऊ कोल्हे, शंकरभाऊ तडाके, अनिलदादा हातागळे, प्रा. डॉ. सुहास नाईक, ॲड. महेश सकट, आर. एस. पाटील, विश्वजीत मोरे, राजे जी. राजगे, उद्योजक सिद्धार्थ कांबळे, सयंपान घुगे, युवा लहुजी संघर्ष सेनेचे महाराष्ट्र अध्यक्ष संतोषभाऊ नेटके, अध्यक्ष माधवदादा गायकवाड, सुनील साठे, सी. के. देव कांबळे, उमाकांत भालेराव, योगेश खरात आदी मान्यवर उपस्थित होते.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६


## थोडक्यात पण महत्वाचे




## एक लाख भारतीय शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा मोफत परवाना

पुणे (आरंभ पर्व) : नवनीत एज्युकेशन लिमिटेडने देशभरातील एक लाख शालेय शिक्षकांसाठी महत्त्वपूर्ण उपक्रम जाहीर केला आहे. या उपक्रमाअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शिक्षकांना कंपनीच्या प्रमुख कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित 'नवनीत एआय' प्रणालीचा मोफत वापर करता येणार आहे. राज्य मंडळे, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ तसेच राष्ट्रीय स्तरावरील इतर शिक्षण मंडळांच्या शिक्षकांसाठी ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. पारंपरिक अध्यापनाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन दैनंदिन अध्यापन अधिक प्रभावी करण्यासाठी या प्रणालीचा उपयोग होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अध्यापन साधनांमुळे शिक्षकांना धड्यांचे अधिक चांगले नियोजन करता येणार असून, प्रशासकीय कामांचा भार कमी करण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी वर्गातील शिकण्याचा अनुभव अधिक रंजक आणि परिणामकारक करण्याची सुविधा मिळणार आहे. या उपक्रमाअंतर्गत शिक्षकांना 'नवनीत एआय' प्रणालीचा संपूर्ण वापर करता येणार आहे. त्यातील विविध साधनांच्या मदतीने काही क्षणांत सादरीकरणे, उजळणीसाठी स्मरणपत्रिका आणि विषयनिहाय धड्यांचे नियोजन तयार करता येणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३शी सुसंगत अध्यापनासाठी आवश्यक शैक्षणिक सामग्रीही तयार करता येणार आहे. नवनीतची डिजिटल पुस्तके आणि चित्रफिती परस्परसंवादी शैक्षणिक सामग्रीमध्ये रूपांतरित करण्यासाठी विशेष फलकाची सुविधा देण्यात आली आहे. यामध्ये अनेक भाषांचा पर्याय उपलब्ध आहे. शरीरशास्त्र आणि खगोलशास्त्राशी संबंधित २७ हून अधिक त्रिमितीय नमुने, तसेच गणित आणि विज्ञानासाठी ५७ हून अधिक आभासी अनुकरणे यामध्ये उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना अधिक रंजक पद्धतीने शिकवता यावे यासाठी भूगोल, इंग्रजी, संगीत, संगणक आणि मानसिक स्वास्थ्य अशा विविध विषयांसाठी विशेष अनुप्रयोग उपलब्ध करून देण्यात आले आहेत. विशेष खेळांमध्ये आधीपासून तयार केलेले शैक्षणिक खेळ तसेच गरजेनुसार बदल करता येतील अशी प्रारूपेही उपलब्ध आहेत. 'नवनीत एआय'मध्ये 'शून्य सूचना अनुभव' देण्यात आला असून, त्यामुळे शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठी स्वतंत्र सूचना-रचना कौशल्य शिकण्याची आवश्यकता भासणार नाही.

## अरणगावी सावता महाराजांच्या पुण्यतिथी साजरी



जुन्नर (आरंभ पर्व) : अरण ता. माढा, जि. सोलापूर येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने राज्याच्या विविध भागांतून पंढरपूरच्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी दिंड्यांच्या माध्यमातून पायी येतात. पंढरपूरहून पुढे विविध दिंड्या आळंदीकडे प्रस्थान करतात. मात्र भक्तवत्सल पांडुरंग स्वतः आपल्या भक्ताच्या भेटीसाठी अरण नगरीत येतो अशी संत परंपरेतील श्रद्धा आहे. अरण येथे संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ७३१व्या पुण्यतिथीनिमित्त हा भक्तिमय सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यानिमित्त जुन्नर तालुक्यातील लोककलावंत तथा दिव्यांग कला विकास केंद्राचे विशेष शिक्षक विकास घोगरे यांनी पांडुरंगाचा वेष परिधान करून भाविकांना साक्षात विठ्ठलाचे दर्शन घडविले. त्यांच्या समवेत नृत्यशास्त्र विशारद व आंतरराष्ट्रीय कलावंत अनंत द्रविड यांनी सावता माळी महाराजांची भूमिका साकारली. पांडुरंगच्या हुबेहूब रूपाने भाविक अक्षरशः भारावून गेले. अनेक भाविकांनी पांडुरंगाच्या चरणी माथा टेकवून दर्शन घेतले. यावेळी परिसरात टाळ-मृदुंगाचा गजर, भक्तिगीते आणि हरिनामाच्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले होते. अत्यंत भावनिक वातावरणात पांडुरंग पालखी आगमन सोहळा पार पडला. दुसऱ्या दिवशी विकास घोगरे यांच्या हस्ते संत सावता महाराजांच्या समाधीला अभिषेक करण्यात आला. त्यानंतर सावता महाराज वास्तव्यास असलेल्या वाड्यावर भारूडाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.भारूडाच्या माध्यमातून भक्ती, संतपरंपरा आणि सामाजिक प्रबोधनाचा व दिव्यांगाबाबत जनजागृती संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाला अंध कलाकार दादू साळवे व सुभाष हिंगोलीकर यांनी हार्मोनियम व मृदुंगाची साथ दिली. त्यांच्या सुरेल साथीने भारूड कार्यक्रमाला विशेष रंगत आली. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी अरण येथील सामाजिक कार्यकर्ते शंकरराव रणदिवे, मंदिराचे सर्व विश्वस्त, ग्रामस्थ उपस्थित होते. विकास घोगरे यांनी आभार मानले.



## मुलींना 'ब्युटी गर्ल्स' नव्हे, तर कणभर झाशीची राणी बनवा : सौ. कोमल कुटे

पुणे (आरंभ पर्व) : नऱ्हे गावात नुकताच कराटे बेल्ट वितरण व खेळाडू सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. स्पोर्ट्स मार्शल आर्ट्स व न्यू मार्शल आर्ट्स इंडिया यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विविध स्तरांवर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा सत्कार खेळाडूंच्या आधारस्तंभ सौ. कोमल सतीश कुटे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पालकांना मार्गदर्शन करताना सौ. कोमल कुटे यांनी मुलींच्या सुरक्षिततेबरोबरच त्यांच्या आत्मविश्वासाला आणि स्वसंरक्षणाच्या कौशल्याला महत्त्व देण्याचे आवाहन केले. "मुलींना केवळ ब्युटी गर्ल्स बनवण्यापेक्षा एक कणभर झाशीची राणी बनवा," असा प्रेरणादायी संदेश त्यांनी पालकांना दिला. मुलींनी शिक्षणासोबतच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय पातळीवर निवड होणाऱ्या खेळाडूंना आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण सहकार्य करू, अशी ग्वाहीही सौ. कोमल कुटे यांनी यावेळी दिली. त्यामुळे खेळाडूंना आपल्या गुणवत्तेच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर चमकण्याची नवी प्रेरणा मिळाली. कार्यक्रमास नऱ्हे पोलीस स्टेशनच्या दामिनी पथकातील महिला पोलीस अधिकारी उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थित मुलींशी संवाद साधत स्वसंरक्षण, सुरक्षितता आणि संकटाच्या प्रसंगी धैर्याने परिस्थितीचा सामना करण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या कार्यक्रमासाठी श्री. किरण माने सर आणि इशिता चंद्रात्रे मॅडम यांचे खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन लाभले. श्री. किरण माने सर यांनी कार्यक्रमाची रूपरेषा आखत सूत्रसंचालनाची जबाबदारीही यशस्वीपणे पार पाडली. कराटे बेल्ट वितरणामुळे खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, स्वसंरक्षणासोबतच शिस्त, आत्मविश्वास आणि जिद्दीची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.




# विठ्ठलवाडी ते जयदेव नगर : विद्युत रोषणाईचे लोकार्पण





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रस्ता परिसरातील विठ्ठलवाडी कमान ते जयदेव नगर या उड्डाणपुलाच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या आकर्षक विद्युत रोषणाईचे लोकार्पण आज उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या विद्युत रोषणाईचे उद्घाटन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते व पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते करण्यात आले.

"पुणे शहराच्या विकासात अशा प्रकारचे सुशोभीकरणाचे उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावतात. नागरिकांना अधिक सुरक्षित आणि सुंदर शहर देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत," असे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी यावेळी सांगितले. पुणे शहरातील वाढती वाहतूक समस्या लक्षात घेऊन नागरिकांना अधिक सुलभ आणि सुरक्षित वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्थानिक लोकप्रतिनिधींच्या प्रयत्नातून विठ्ठलवाडी कमान ते जयदेव नगर उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली आहे. या उड्डाणपुलामुळे सिंहगड रस्ता परिसरातील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मोठी मदत झाली आहे. आता या उड्डाणपुलाच्या परिसराचे सुशोभीकरण आणि सुरक्षितता अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. या विद्युत रोषणाईमुळे उड्डाणपुलाचा परिसर रात्रीच्या वेळी अधिक उजळून निघाला असून, संपूर्ण परिसराला आकर्षक आणि देखणे स्वरूप प्राप्त झाले आहे.

प्रवाशांसह परिसरातील नागरिकांसाठीही अधिक सुरक्षित, प्रकाशमय आणि आनंददायी वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील महत्त्वाच्या रस्ते व वाहतूक सुविधांच्या विकासा सोबतच त्यांचे सुशोभीकरण करण्यावरही भर देणे आवश्यक आहे. त्याच दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

सिंहगड रस्ता परिसराचा वाढता विस्तार, नागरिकांची वाढती वर्दळ आणि वाहतुकीची गरज लक्षात घेता भविष्यातही या भागातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे यावेळी महापौर मंजुषा नागपुरे यांनी सांगितले.

**या लोकार्पण सोहळ्यास पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक अॅड. प्रसन्नदादा जगताप, श्रीकांत जगताप, सचिन मोरे, ज्योती गोसावी, वृषाली रिठे, प्रिया गदादे पाटील, महेश वाबळे, सुरज लोखंडे, बाळासाहेब ओसवाल, माजी नगरसेवक आनंद रिठे यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उड्डाणपुलावर करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईमुळे परिसराच्या सौंदर्यात लक्षणीय भर पडली असून, नागरिकांकडूनही या उपक्रमाचे स्वागत करण्यात येत आहे.**

## एअरटेल आयपीटीव्हीची स्वातंत्र्यदिन विशेष वॉचलिस्ट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

या स्वातंत्र्यदिनी एअरटेल आणि नेटफ्लिक्सने धैर्य, शौर्य आणि त्यागाची प्रेरणादायी कहाणी देशभरातील कृतज्ञतेच्या भावनेशी जोडण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. भारतीय हवाई दलाच्या गोल्डन ॲरोज स्क्वॉड्रनने १९९९ च्या कारगिल युद्धात बजावलेल्या भूमिकेपासून प्रेरणा घेतलेले 'ऑपरेशन सफेद सागर' हे एअरटेल आयपीटीव्हीच्या स्वातंत्र्यदिन विशेष वॉचलिस्टचे प्रमुख आकर्षण ठरले आहे. या माध्यमातून संघर्षाच्या अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत सेवा बजावणाऱ्या हवाई योद्ध्यांचे धैर्य, अचूकता आणि त्याग प्रेक्षकांना जवळून अनुभवता येणार आहे. 'एक देश, दहा लाख धन्यवाद' या संकल्पनेतून #MillionThankYou उपक्रम राबविण्यात येत असून, एअरटेल आणि नेटफ्लिक्सने देशभरातील नागरिकांना भारतीय हवाई दलाचा सन्मान करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचे आवाहन केले आहे. नेटफ्लिक्स 'ऑपरेशन सफेद सागर'ची कहाणी संपूर्ण भारतातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत आहे, तर एअरटेल देशवासीयांना सामूहिक संदेशातून आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून एअरटेलने १० राज्यांमधील ११ शहरांमध्ये 'थँक यू स्टेशन्स' उभारली आहेत.

## महात्मा फुले यांच्या २००व्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे पत्रक



**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २००व्या जयंतीनिमित्त वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या उपक्रमांची माहिती देणाऱ्या पत्रकाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. युवा माळी मिशनचे प्रमुख युवासेना शहरप्रमुख तथा भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे यांनी हे पत्रक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले. 'भिडेवाडा ते फुलेवाडा' या संकल्पनेतून महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक व परिवर्तनवादी कार्याचा जागर करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

या उपक्रमांतर्गत एक लाख विद्यार्थ्यांना फुलेवाड्याला भेट घडवून आणणे, महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक व सोहळा आयोजित करणे, निबंध, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा आणि चित्रकला स्पर्धा घेणे, तसेच ज्योतिराव फुले यांच्या कार्यावर आधारित पुस्तक प्रकाशन व जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

याशिवाय 'मुलगी वाचवा, मुलगी शिकवा', 'माझी शाळा सुंदर शाळा' यांसारखे उपक्रम राबविणे, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करणे, राज्यभरातील विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, फुले दांपत्यांच्या कार्यावर विचारप्रबोधन व्याख्याने आयोजित करणे, तसेच पोवाडा व विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे.

भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाच्या कामाला गती देण्यासोबतच या ऐतिहासिक वास्तूच्या माध्यमातून महात्मा फुले दांपत्यांचे शैक्षणिक व सामाजिक विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे. यावेळी निलेश गिरमे यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २००व्या जयंतीनिमित्त राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती असलेले पत्रक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपूर्द केले. त्यांच्या हस्ते पत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. या उपक्रमांना शासनस्तरावर आवश्यक सहकार्य मिळावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

## सतरा सेंटीमीटरचा ट्यूमर काढला; सात वर्षांनंतर आयटी अभियंता पुन्हा चालू लागला

### पुण्यातील मणिपाल हॉस्पिटल खराडीच्या डॉक्टरांचे यश; अॅडव्हान्स्ड मायक्रोसर्जरीद्वारे पाठीच्या कण्यातील दुर्मिळ गाठ काढली

> अॅडव्हान्स्ड मायक्रोस्कोपिक स्पाइनल शस्त्रक्रिया आणि उच्च क्षमतेच्या शस्त्रक्रियात्मक सूक्ष्मदर्शकाच्या मदतीने ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया करण्यात आली. पाठीचा कणा आणि सभोवतालच्या मज्जातंतूंचे संरक्षण करत ट्यूमर सुरक्षितपणे काढण्यात डॉक्टरांना यश आले.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे, १३ ऑगस्ट : मणिपाल हॉस्पिटल खराडी येथील डॉक्टरांनी एका ५२ वर्षीय वरिष्ठ आयटी अभियंत्याच्या पाठीच्या कण्यात असलेला तब्बल १७ सेंटीमीटर लांबीचा दुर्मिळ आणि कर्करोग नसलेला ट्यूमर यशस्वीपणे काढला. या ट्यूमरमुळे गेल्या सात वर्षांपासून व्हीलचेअरचा आधार घ्यावा लागणाऱ्या रुग्णाने शस्त्रक्रियेनंतर पुन्हा उभे राहून चालण्यास सुरुवात केली आहे.

महेश पाटील (नाव बदलले आहे) यांना सुरुवातीला डाव्या पायात सतत वेदना आणि बधिरता जाणवत होती. कालांतराने दोन्ही पायांमध्ये तीव्र अशक्तपणा निर्माण झाला आणि त्यांची चालण्याची क्षमता पूर्णपणे नष्ट झाली. त्यामुळे त्यांच्या वैयक्तिक तसेच व्यावसायिक जीवनावर मोठा परिणाम झाला. त्यांना कामासाठी प्रवास करणे, दीर्घकाळ बसणे आणि दैनंदिन कामे स्वतंत्रपणे करणेही कठीण झाले होते. त्यानंतर करण्यात आलेल्या एमआरआय तपासणीत पाठीच्या कण्यात मोठी गाठ असल्याचे स्पष्ट झाले. पुढील उपचारांसाठी त्यांना मणिपाल हॉस्पिटल खराडी येथे दाखल करण्यात आले. तपासणीनंतर त्यांना सुमारे १७ सेंटीमीटर आकाराचा इंट्राड्यूरल एक्स्ट्रामेड्युलरी श्वानोमा असल्याचे निदान झाले. हा मज्जातंतूंच्या आवरणातून निर्माण होणारा सामान्यतः कर्करोग नसलेला ट्यूमर असतो. मात्र, या प्रकरणात गाठीचा आकार मोठा असल्याने ती पाठीच्या कण्यावर आणि मज्जातंतूंवर मोठा दबाव टाकत होती. मणिपाल हॉस्पिटल खराडी येथील स्पाइन सर्जरीचे कन्सल्टंट डॉ. प्रविण सुरवशे यांनी सांगितले की, एवढ्या मोठ्या आकाराचा पाठीच्या कण्यातील ट्यूमर अत्यंत दुर्मिळ असून, शस्त्रक्रियेसाठी अत्यंत काळजीपूर्वक नियोजन आवश्यक होते. उपचार न झाल्यास कायमचे अपंगत्व, मूत्राशय व आतड्यांवरील नियंत्रण जाणे तसेच मज्जातंतूंचे कायमस्वरूपी नुकसान होण्याचा धोका होता. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या प्रकृतीत आशादायक सुधारणा झाली आहे. शस्त्रक्रियेनंतर दोन महिन्यांनी ते स्वतंत्रपणे उभे राहू शकतात, चालण्याच्या साधनाच्या मदतीने चालू शकतात आणि आता आधाराशिवायही कमी अंतर चालण्यास त्यांनी सुरुवात केली आहे.

## एमजी हेक्टरच्या सातव्या वर्धापनदिनानिमित्त विशेष कार्यक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



भारतातील लोकप्रिय एसयूव्ही एमजी हेक्टरच्या सात वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा उत्सव साजरा करण्यासाठी जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने विशेष 'ॲनिव्हर्सरी प्रोग्राम' जाहीर केला आहे. ऑगस्ट २०२६ मध्ये एमजी हेक्टर खरेदी करणाऱ्या पात्र ग्राहकांना या मर्यादित कालावधीच्या योजनेअंतर्गत ६० हजार रुपयांपर्यंतचे लाभ मिळणार आहेत. यामध्ये एक्सचेंज बोनस, लॉयल्टी रिवॉर्ड्स, कॉर्पोरेट लाभ आणि वर्धापनदिन सवलतींचा समावेश आहे. जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाचे मुख्य व्यावसायिक अधिकारी विनय रैना म्हणाले, "एमजी हेक्टरने गेल्या सात वर्षांत अविश्वसनीय प्रवास केला असून, हजारो भारतीय कुटुंबांचा विश्वास संपादन केला आहे. हा महत्त्वपूर्ण टप्पा साजरा करताना ग्राहकांचे आभार मानण्यासाठी आम्ही हा मालकी अनुभवावर आधारित कार्यक्रम आणला आहे. हा कार्यक्रम ग्राहकांना अधिक मूल्य देण्यासोबतच ग्राहक-केंद्रित दृष्टिकोन आणि एमजी हेक्टरचा मालकी अनुभव अधिक चांगला करण्याची आमची वचनबद्धता दर्शवतो."

### नवी दिल्लीत १० ते १२ सप्टेंबरदरम्यान धोरणकर्ते, उद्योगपती आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्या एकाच मंचावर

# 'एडेक्स + एअरपोर्ट एक्स्पो २०२६'चे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील संरक्षण उत्पादन, एरोस्पेस, विमानचालन आणि विमानतळ पायाभूत सुविधा क्षेत्रातील वाढते नेतृत्व अधोरेखित करणारा 'एडेक्स + एअरपोर्ट एक्स्पो २०२६' हा भव्य आंतरराष्ट्रीय कार्यक्रम १० ते १२ सप्टेंबर २०२६ दरम्यान नवी दिल्लीतील यशोभूमी, इंडिया इंटरनॅशनल कन्व्हेन्शन अँड एक्स्पो सेंटर येथे आयोजित करण्यात आला आहे. या तीन दिवसीय कार्यक्रमात धोरणकर्ते, संरक्षण उत्पादक, एरोस्पेस कंपन्या, विमानतळ विकासक, तंत्रज्ञान पुरवठादार, संशोधन संस्था, गुंतवणूकदार आणि जागतिक उद्योगपती एकाच मंचावर येणार आहेत. या माध्यमातून संरक्षण, एरोस्पेस, विमानचालन आणि विमानतळ पायाभूत सुविधा क्षेत्रात भारताचे जागतिक स्थान अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. 'एडेक्स + एअरपोर्ट' या अंतर्गत आयोजित होणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषदांचे उद्दिष्ट अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रदर्शन, धोरणात्मक भागीदारीला चालना आणि नव्या व्यावसायिक संधी निर्माण करणे हे आहे. संरक्षण उत्पादक, सरकारी संस्था, सशस्त्र दल, संशोधन संस्था, तंत्रज्ञान व पायाभूत सुविधा पुरवठादार तसेच जागतिक गुंतवणूकदारांसाठी हे महत्त्वपूर्ण व्यावसायिक आणि तंत्रज्ञान व्यासपीठ ठरणार आहे. या कार्यक्रमाला नागरी विमान वाहतूक मंत्रालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, संरक्षण संशोधन व विकास संस्था, नागरी विमान वाहतूक महासंचालनालय आणि वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषद यांचे पाठबळ मिळाले आहे. तसेच 'मेक इन इंडिया' आणि 'स्टार्टअप इंडिया' या उपक्रमांसह एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया, ड्रोन फेडरेशन ऑफ इंडिया आणि एअर कार्गो फोरम इंडिया या औद्योगिक संघटनांचाही सहभाग आहे.

> सोसायटी ऑफ इंडियन एरोस्पेस टेक्नॉलॉजीज अँड इंडस्ट्रीजचे माजी मानद अध्यक्ष आणि हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडचे माजी अध्यक्ष डॉ. सी. जी. कृष्णदास नायर म्हणाले, "एसआयएटीआय आणि टॅफकॉनद्वारे आयोजित 'एडेक्स + एअरपोर्ट एक्स्पो २०२६' हे प्रदर्शन एरोस्पेस, संरक्षण आणि विमान वाहतूक क्षेत्रातील नवोपक्रमात भारताचे जागतिक स्थान मजबूत करण्यात महत्त्वपूर्ण योगदान देईल. या महत्त्वपूर्ण औद्योगिक व्यासपीठावर सहभागी होण्यासाठी मी उद्योग क्षेत्रातील सर्व भागधारकांना आमंत्रित करतो."

भारताचे एरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्र सध्या मोठ्या परिवर्तनाच्या टप्प्यातून जात आहे. 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' यांसारख्या उपक्रमांमुळे स्वदेशी उत्पादन, तांत्रिक नवोपक्रम, खासगी क्षेत्राचा सहभाग आणि संरक्षण उत्पादनांच्या निर्यातीला चालना मिळत आहे. धोरणात्मक सुधारणा, वाढता भांडवली खर्च आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यामुळे भारतीय एरोस्पेस आणि संरक्षण बाजारपेठ २०३० पर्यंत ७० अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर 'एडेक्स + एअरपोर्ट एक्स्पो २०२६' हे देशांतर्गत तसेच जागतिक उद्योगांसाठी गुंतवणूक, सहकार्य आणि तंत्रज्ञानाच्या नव्या संधी उपलब्ध करून देणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### स्वाभिमान दिवस साजरा, आजी-माजी सैनिकांचा केला सन्मान

**दौंड (आरंभ पर्व) :** कानगाव गावचे भूषण तसेच आजी-माजी सैनिक सन्मान सोहळा 10 ऑगस्ट 2022 साला पासून स्वाभिमानी दिवस म्हणून सालाबाद प्रमाणे दि, 10: 8: 2026 या दिवशी साजरा करण्यात येतो त्याचप्रमाणे कानगाव ग्रामपंचायत च्या वतीने आजी-माजी सैनिक सन्मान सोहळा साजरा करण्यात आला त्यानिमित्ताने या सन्मान सोहळ्यासाठी कानगाव गावचे विद्यमान सरपंच राहुलजी चाबुकस्वार उपसरपंच विठ्ठल कोन्हाळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व्यवस्थापन समिती विद्यमान अध्यक्ष योगेश गवळी संदेश शिंदे,नाना गवळी,नलवडे तसेच गवळी हे या कार्यक्रमासाठी उपस्थित होते, इथून पुढे दरवर्षी याच प्रकारे सर्व आजी-माजी सैनिकांचा सन्मान सोहळा ग्रामपंचायत च्या वतीने साजरा करण्यात येईल असे आश्वासन सरपंच तथा प्रशासक राहुल जी चाबुकस्वार (संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती दौंड ) यांनी दिले, या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# संस्कार स्कूलचा बुद्धिबळाच्या पटावर दणदणीत विजय

## अरफात सय्यद प्रथम; 'सर्वोत्कृष्ट शाळे'चा मान संस्कार स्कूलला

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

श्री स्वामी चेस अकॅडमीच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत संस्कार प्रायमरी ॲण्ड हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिचातुर्याची आणि खेळातील कौशल्याची दमदार छाप उमटवत उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत इयत्ता १० वीचा विद्यार्थी *अरफात सय्यद याने १७ वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळविले, तर उत्कृष्ट सांघिक कामगिरीच्या जोरावर *संस्कार स्कूलला 'सर्वोत्कृष्ट शाळा' हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला.*

दौंड येथील गोपाळवाडी सभागृह, विरंगुळा केंद्र येथे पार पडलेल्या या स्पर्धेत संस्कार



स्कूलच्या एकूण १३ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध वयोगटांमध्ये सहभागी होत विद्यार्थ्यांनी बुद्धिबळाच्या पटावर प्रत्येक चाल विचारपूर्वक खेळत एकाग्रता, संयम, तल्लख बुद्धिमत्ता, अचूक निर्णयक्षमता आणि रणनीतीचे उत्कृष्ट दर्शन घडविले. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व १३ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

*१७ वर्षांखालील गटात इयत्ता १० वीचा अरफात सय्यद याने प्रथम क्रमांक पटकावत रोख पारितोषिक व आकर्षक चषक मिळविला. तसेच १४ वर्षांखालील गटात इयत्ता ४ थीची अलंक्रिता देशमुख आणि इयत्ता ३ रीचा ऋग्वेद बिडवे यांनी उल्लेखनीय खेळाचे प्रदर्शन करत उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.* विद्यार्थ्यांच्या या सामूहिक कामगिरीची दखल घेत *संस्कार स्कूलला 'सर्वोत्कृष्ट शाळा' चषक प्रदान करण्यात आला.*

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशानंतर शाळेच्या मुख्य सल्लागार सौ. अरुणा पवार मॅडम व मुख्य कार्यकारी अधिकारी प्रतिभा पवार मॅडम यांनी विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्या यशाचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीसाठी त्यांना मनःपूर्वक प्रोत्साहन दिले. त्यांच्या या भेटीमुळे विद्यार्थ्यांचा उत्साह अधिक वाढला.

स्पर्धेच्या वेळी विद्यार्थ्यांसोबत प्रीती गंगावणे मॅडम व राणी भापकर मॅडम उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत संपूर्ण स्पर्धेदरम्यान त्यांचा उत्साह कायम ठेवला.

संस्कार स्कूलचे संस्थापक मा. श्री. जयंत पवार सर व मुख्याध्यापिका सौ. सुनिता मिनीगी यांच्या प्रोत्साहनामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा व विविध स्पर्धात्मक क्षेत्रांमध्ये आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी सातत्याने संधी मिळत आहेत.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. एका बाजूला वैयक्तिक विजेतेपदाची चमक, तर दुसऱ्या बाजूला 'सर्वोत्कृष्ट शाळा'चा मान—या दुहेरी यशामुळे संस्कार स्कूलच्या बुद्धिबळ क्षेत्रातील कामगिरीला नवे बळ मिळाले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, संस्कार स्कूलच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा अधिक समृद्ध झाली आहे.



### शिवाजीराव मते यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खडकवासला विधानसभा प्रमुख शिवाजीराव मते यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. आधार रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिरात तब्बल १०५ पिशव्या रक्त संकलित करण्यात आले. "समाजसेवा हीच खरी राजकारणाची ओळख आहे आणि वाढदिवस साजरा करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे समाजासाठी काहीतरी देणे," असे शिवाजीराव मते यांनी यावेळी सांगितले.

- १०५ पिशव्या रक्त संकलित; शंभरहून अधिक महिलांनी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अभियानाचा घेतला लाभ

> वाढदिवसाच्या निमित्ताने केवळ शुभेच्छा स्वीकारण्याऐवजी रक्तदान, महिला सक्षमीकरण आणि समाजोपयोगी उपक्रम राबवून शिवाजीराव मते यांनी सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी महिलांसाठी एसटी बसचे एनसीएमसी स्मार्ट कार्ड अभियान राबविण्यात आले. या अभियानाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून शंभरहून अधिक महिलांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमांचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. रक्तदान शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदत मिळावी, या उद्देशाने कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान केले.

यावेळी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने शिवाजीराव मते यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गणपत बुवा खाटपे, तानाजी पवळे, उमेश सुर्वे, दत्ता भाऊ सुर्वे, निवृत्ती वाव्हळ, आकाश यादव आणि गुरुदत्ता हगवणे यांच्यासह विविध मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, शिवाजीराव मते यांना वाढदिवसानिमित्त विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत, बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे तसेच खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर यांनी शिवाजीराव मते यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रेय तुले, सचिन काटे, बाळासाहेब मंडलिक, जितेंद्र सपकाळ, गोकुळ रायकर, किशोर ढेंगळे, मिलिंद गवळी, स्वयम मते, भाऊसाहेब पोळके, सुरेश पोळके, सिद्धार्थ पोळके, राकेश मोरे, बाळकृष्ण वांजळे आणि किशोर मते यांनी सहकार्य केले.

## एचपी ओम्नीपॅड १२ भारतात दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एचपी इंडियाने भारतात प्रथमच एचपी ओम्नीपॅड १२ उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. शिक्षण, काम आणि निर्मितीच्या विविध गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले हे उपकरण लॅपटॉपची उत्पादकता आणि टॅब्लेटची सुलभता यांचा मेळ साधते. काढता येण्याजोग्या कीबोर्डमुळे वापरकर्त्यांना टॅब्लेट आणि लॅपटॉप अशा दोन्ही पद्धतीने त्याचा वापर करता येतो. विद्यार्थी, प्रथमच संगणकीय उपकरण वापरणारे, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग आणि तरुण व्यावसायिकांसाठी हे उपकरण तयार करण्यात आले आहे. आभासी वर्ग, नोंदी करणे, अभ्यास, कार्यालयीन कामे, सादरीकरणे, व्हिडिओ संभाषण तसेच प्रवासादरम्यान निर्मितीची कामे करण्यासाठी ओम्नीपॅड १२ उपयुक्त



- लॅपटॉपची उत्पादकता आणि टॅब्लेटची लवचिकता एकाच उपकरणात

ठरते. क्वालकॉम स्नॅपड्रॅगन प्रोसेसर आणि अँड्रॉइड १६ प्रणालीमुळे दैनंदिन संगणकीय कामांसाठी सहज आणि प्रतिसादक्षम अनुभव मिळतो. उपकरणामध्ये काढता येण्याजोगा कीबोर्ड असल्याने टच-आधारित टॅब्लेटचा अनुभव आणि लॅपटॉपसारखी उत्पादकता यांच्यात सहज बदल करता येतो.

## 'वारी वेशभूषा स्पर्धा २०२६'मध्ये राज योगेश चव्हाण पुणे शहरात प्रथम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या वतीने मा. महापौर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'सेवा वारी २०२६' उपक्रमांतर्गत आयोजित 'वारी वेशभूषा स्पर्धा २०२६' आणि 'वारी छायाचित्रण स्पर्धा २०२६' यांच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात धायरी येथील नूतन इंग्लिश मीडियम स्कूलच्या राज योगेश चव्हाण याने ११ ते १६ वर्षे वयोगटात प्रथम क्रमांक पटकावत घवघवीत यश मिळविले.

वारकरी परंपरेचा सुंदर व आकर्षक वेश परिधान करून राजने आपल्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणातून महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरा, संस्कृती आणि भक्तीभावाचे प्रभावी दर्शन घडविले. त्याच्या उत्कृष्ट



सादरीकरणाची दखल घेत परीक्षकांनी त्याला प्रथम क्रमांकाचा मान दिला. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा १० ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहात पार पडला. वारी वेशभूषा स्पर्धेला ७ हजारांहून अधिक, तर वारी छायाचित्रण स्पर्धेला १ हजार ५०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. या प्रसंगी मा. महापौर सौ. मंजुषा नागपुरे, मा. उपमहापौर श्री. परशुराम वाडेकर, मा. विरोधी पक्षनेते श्री. निलेश निकम, मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) श्रीमती पवनीत कौर, मा. उपायुक्त घनकचरा व्यवस्थापन श्री. संतोष वारुळे, मा. उपायुक्त श्रीमती आशा राऊत, श्री. अविनाश सकपाळ, श्री. विजयकुमार थोरात, श्री. अरविंद माळी, श्री. माधव जगताप तसेच संबंधित क्षेत्रीय कार्यालयांचे महापालिका सहाय्यक आयुक्त उपस्थित होते.

राजच्या या उल्लेखनीय यशाबद्दल नूतन इंग्लिश मीडियम स्कूलच्या संस्थापिका सौ. सुनीता डांगे यांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले. राजने आपल्या मेहनतीने, आत्मविश्वासाने आणि कलागुणांनी शाळेचे नाव उज्ज्वल केल्याबद्दल त्यांनी त्याचे कौतुक केले. तसेच भविष्यातही अशाच प्रकारे यशाची नवी शिखरे गाठावीत, अशा शुभेच्छा दिल्या. राजच्या या यशामुळे नूतन इंग्लिश मीडियम स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जवळगाव नं. २ आरोग्य उपकेंद्राची दुरवस्था

## डॉक्टरच्या खुर्चीवर स्टाफ नर्स : स्वच्छतागृहाचीही दुरवस्था

- आरोग्य प्रशासनाचे दुर्लक्ष, रुग्णांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा नागेश चव्हाण यांचा आरोप

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

जवळगाव नं. २ : ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आलेल्या जवळगाव नं. २ येथील आरोग्य उपकेंद्राची दुरवस्था समोर आली आहे. सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस नागेश चव्हाण हे उपचारासाठी या आरोग्य उपकेंद्रात गेले असता त्यांना तेथील अनेक धक्कादायक बाबी निदर्शनास आल्या. आरोग्य उपकेंद्रात पाहणी केली असता



डॉक्टरांसाठी असलेल्या खुर्चीवर स्टाफ नर्स बसल्याचे दिसून आले. त्यामुळे उपकेंद्रातील डॉक्टरांची उपलब्धता, मनुष्यबळ आणि आरोग्य सेवांच्या नियोजनाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यासोबतच उपकेंद्रातील स्वच्छतागृहाची अवस्था अत्यंत खराब असल्याचे निदर्शनास आले. आरोग्य सेवा देणाऱ्या केंद्रातच स्वच्छतेचा अभाव असल्याने रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे.


नागेश चव्हाण यांनी प्रत्यक्ष पाहणीदरम्यान उपकेंद्रातील विविध समस्या पाहून आरोग्य प्रशासनाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली. ग्रामीण भागातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क असताना, आरोग्य उपकेंद्राची अशी अवस्था असेल तर प्रशासन नेमके काय करत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. आरोग्य उपकेंद्रातील डॉक्टरांची उपलब्धता, स्वच्छतागृहाची स्वच्छता, आवश्यक मनुष्यबळ आणि मूलभूत सुविधांकडे आरोग्य विभागाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

जवळगाव नं. २ आरोग्य उपकेंद्राच्या दुरवस्थेची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन पाहणी करावी आणि आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागेश चव्हाण यांनी केली आहे.. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला आहे.

## 'स्ट्रक्ट्रोमॅक्स' आणि 'वेल्डस्टार' सादर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (एएम/एनएस इंडिया)ने भारतातील वाढत्या पायाभूत सुविधा, उत्पादन, बांधकाम, ऊर्जा, वाहतूक आणि अवजड अभियांत्रिकी क्षेत्रांसाठी विकसित केलेल्या 'स्ट्रक्ट्रोमॅक्स' आणि 'वेल्डस्टार' या दोन नव्या हेवी स्टील प्लेट ब्रँडचे अनावरण केले. गुजरातमधील हजीरा येथील एएम/एनएस इंडियाच्या अत्याधुनिक प्लेट मिल प्रकल्पात ही उत्पादने विकसित करण्यात आली आहेत. प्रगत रोलिंग आणि उष्णता उपचार तंत्रज्ञानासोबत अचूक धातुकर्म प्रक्रिया आणि कठोर गुणवत्ता नियंत्रणाचा वापर करण्यात आला आहे. 'स्ट्रक्ट्रोमॅक्स' हे थर्मो-मेकॅनिकल कंट्रोल्ड प्रोसेसिंग (टीएमसीपी) तंत्रज्ञानाच्या आधारे विकसित करण्यात आले आहे. पूल, उंच इमारती, समुद्रातील प्रकल्प, रेल्वे, पवन ऊर्जा प्रकल्प तसेच विविध अवजड अभियांत्रिकी क्षेत्रांमध्ये त्याचा वापर करता येणार आहे.




या स्टील प्लेटमध्ये उत्कृष्ट वेल्डिंग क्षमता, उच्च मजबुती, भार सहन करण्याची क्षमता, गंजरोधकता आणि फॅब्रिकेशन कार्यक्षमता असल्याचे कंपनीने म्हटले आहे. त्यामुळे आव्हानात्मक कार्यप्रणाली आणि विविध हवामान परिस्थितींमध्येही टिकाऊ व स्थिर संरचना उभारण्यास अभियंते आणि प्रकल्प विकासकांना मदत होणार आहे. 'वेल्डस्टार' ही अतिउच्च सामर्थ्याच्या स्टील प्लेटची श्रेणी आहे. या उत्पादनामुळे सुरक्षितता आणि टिकाऊपणाशी तडजोड न करता संरचनांचे वजन कमी करणे, भार वाहून नेण्याची क्षमता वाढवणे, इंधनाचा वापर कमी करणे आणि संपूर्ण कार्यकाळातील खर्च कमी करणे शक्य होणार आहे.

# खडकवासला धरण चौकात 'रास्ता रोको'

## कोंडीवर कायमस्वरूपी उपायांची महाविकास आघाडीकडून मागणी

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला धरण परिसरातील वाढती वाहतूक कोंडी, अरुंद रस्ते आणि पर्यटकांच्या वाहनांमुळे स्थानिक नागरिकांना होणाऱ्या त्रासाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने रविवारी (दि. ९) सायंकाळी खडकवासला धरण चौकात 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात आले. या वेळी कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या निषेधार्थ घोषणाबाजी करीत रस्ते रुंदीकरणासह वाहतूक व्यवस्थेत तातडीने सुधारणा करण्याची मागणी केली. खडकवासला धरण चौपाटीसह पानशेत, वरसगाव, सिंहगड आणि राजगड परिसरात शनिवार, रविवार तसेच सुट्टीच्या



दिवशी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. त्यामुळे खडकवासला धरण तीरावरील अरुंद रस्ता, खडकवासला गाव, किरकटवाडी फाटा आणि नांदेड परिसरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. या कोंडीचा सर्वाधिक फटका स्थानिक नागरिक, व्यावसायिक आणि नियमित प्रवाशांना बसत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते हे धरण चौकात एकत्र आले. त्यांनी काही काळ रास्ता रोको करीत प्रशासनाने वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली. आंदोलनकर्त्यांच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन नांदेड सिटी पोलिस ठाणे आणि वाहतूक विभागाला देण्यात आले. रस्ते रुंदीकरणासाठी वनविभागाशी समन्वय साधावा, पर्यायी वाहतूक मार्गांचा विचार करावा तसेच गर्दीच्या काळात अतिरिक्त वाहतूक पोलिसांची नियुक्ती करावी, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या. या वेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष लहूअण्णा निवंगुणे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते नगरसेवक काकासाहेब चव्हाण, नगरसेविका अनिता इंगळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या शहराध्यक्षा स्वाती पोकळे, खडकवासला विधानसभा अध्यक्ष संदीप मते ,शिवसेना ठाकरे गटाचे विधानसभा प्रमुख शिवाजीराव मते, नितीन वाघ, अवधूत मते, काँग्रेसचे खडकवासला विधानसभा अध्यक्ष सुरेश मते, आबा जगताप, त्रिंबक मोकाशी, स्मिता पोकळे, आनंद मते, तानाजी पवळे, अतुल धावडे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> खडकवासला धरण तीरावरील वाहतूक कोंडीमुळे पानशेत, डोणजे भागातील स्थानिक नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. अत्यावश्यक प्रसंगी रुग्णवाहिकाही तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून पडतात. त्यामुळे वेळेत उपचार न मिळाल्याने निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत. प्रशासनाने या गंभीर समस्येवर लवकरात लवकर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.



## ग्रामपंचायत, लिंगाळी ता, दौंड, जि. पुणे

**B1 पेपर नोटीस 1 सन २०२५/२०२६**

ग्रामपंचायत लिंगाळी, ता, दौंड, जि, पुणे यांच्याकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा) पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत लिंगाळी, ता. दौंड, जि, पुणे १३/०८/२०२६ ते दिनांक १५/०८/२०२६ कलावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायतमध्ये स्विकारली जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी व दिनांक | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | वार्ड क्रमांक ३ अंतर्गत रस्ता करणे. | ४००००० /- | १३/०८/२०२६ ते १५/०८/२०२६ | १००/- | सूट सु.बे.अ. |
| २ | वार्ड क्रमांक ४ अंतर्गत रस्ता करणे. | ४०००००/- | १३/०८/२०२६ ते १५/०८/२०२६ | १००/- | सूट सु.बे.अ. |
| ३ | नळ पाणी पुरवठा करणे. | १००००००/- | १३/०८/२०२६ ते १५/०८/२०२६ | १००/- | सूट सु.बे.अ. |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत नावे धनादेश / डी.डी जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) यापूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ६) आपण तांत्रिक लीफाफा उघडण्यात येईल. सदर निविदेबाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकारी ग्रामपंचायत लिंगाळी यांनी राखून ठेवले आहेत.

सही/-

ग्रामसेवक सरपंच

ग्रामपंचायत, लिंगाळी ता, दौंड, जि. पुणे


दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### उच्छिल येथे जागतिक आदिवासी दिन उत्साहात संपन्न

जुन्नर (आरंभ पर्व) : आदिवासी भागातील उच्छिल ता.जुन्नर येथील जिल्हा परिषद शाळेत जागतिक आदिवासी दिन उत्साहात पार पडला. या निमित्ताने 'आदिवासी विचार मंच, महाराष्ट्र राज्य' यांच्या माध्यमातून मुंबई महानगरपालिकेचे उपअभियंताआदिनाथ झाडे यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आदिवासी क्रांतिकारकांच्या प्रतिमेची रंगभरण व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी आबा जननायक बिरसा मुंडा, आद्य क्रांतिकारक वीर राघोजी भांगरे आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी शाळेचे पदवीधर शिक्षक सुभाष मोहरे यांनी या थोर पुरुषांच्या आणि क्रांतिकारकांच्या प्रेरणादायी कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीच्या अध्यक्षा सविता नवले होत्या. उपाध्यक्ष सागर बांबळे, शिक्षणतज्ज्ञ सदस्य शरद नवले, सदस्या सविता आढारी, रेश्मा केंगले, कांचन नवले, सदस्य शिवाजी नवले, अशोक भालेराव, विमल करवंदे, हिराबाई नवले, विशेष शिक्षिका जयश्री मुंढे व आरोग्य विभाग कर्मचारी मेमाणे व पालकवर्ग उपस्थित होते. या प्रसंगी शिक्षणतज्ज्ञ सदस्य शरद नवले यांनी सर्व विद्यार्थ्यांना १५ ऑगस्ट रोजी जेवणाची ताटे भेट देणार असल्याचे जाहीर केले. त्याचप्रमाणे शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सागर बांबळे यांनी विद्यार्थ्यांना नवीन ओळखपत्रे देण्याची घोषणा केली. प्रास्ताविक सुभाष मोहरे यांनी केले. आरती मोहरे यांनी संयोजन केले. मुख्याध्यापिका स्मिता ढोबळे यांनी आभार मानले.



### अंमली पदार्थांवरील जनजागृती व गुड टच-बॅड टच मार्गदर्शन

पुणे (आरंभ पर्व) : जागरूक विद्यार्थी – सुरक्षित समाज – सुरक्षित भारत या उपक्रमांतर्गत कै. नारायणराव नवले प्राथमिक मनपा शाळा क्र. २०४ (बी) येथे विद्यार्थ्यांसाठी अंमली पदार्थांचे दुष्परिणाम, सायबर सुरक्षा तसेच गुड टच – बॅड टच या विषयांवर जनजागृतीपर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी नऱ्हे पोलीस ठाण्याच्या दामिनी पथकातील हेड कॉन्स्टेबल काकडे मॅडम आणि पोलीस कॉन्स्टेबल आंबीकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मोबाईलचा अतिरेक, ओटीपी शेअर न करणे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर याबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांनी स्वतः सतर्क राहून आपल्या पालकांनाही सायबर सुरक्षेबाबत जागरूक करण्याचे आवाहन केले. याशिवाय अंमली पदार्थांच्या सेवनामुळे व्यक्ती, कुटुंब, समाज आणि देशावर होणारे गंभीर दुष्परिणाम विविध उदाहरणांद्वारे समजावून सांगण्यात आले. गुड टच – बॅड टच या विषयावरही विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारत मोकळेपणाने संवाद साधला. या उपयुक्त मार्गदर्शनाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता मानकर यांनी शाळेच्या वतीने दामिनी पथकातील दोन्ही महिला पोलीस कर्मचाऱ्यांचे आभार मानले. यावेळी दत्तात्रय सूर्यवंशी, शर्मिला करंजावणे आणि श्रद्धा नाडकर्णी हे वर्गशिक्षक उपस्थित होते.

### खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी कथन केला राष्ट्र मंत्राचा महिमा



पुणे (आरंभ पर्व) : अनेकांच्या त्याग आणि बलिदानाने मिळालेले स्वराज्य टिकवण्यासाठी आणि सुराज्य घडवण्यासाठी युवा पिढीवर राष्ट्र प्रेमाचे संस्कार घडवणे आवश्यक असून त्यासाठीचे सामर्थ्य 'वंदे मातरम' या राष्ट्र मंत्रात आहे, अशा शब्दात खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी वंदे मातरम या गीताचा महिमा कथन केला. यावेळी त्यांनी सध्या संपूर्ण वंदे मातरम युवा पिढीपर्यंत पोहोचविण्याची आग्रही अपेक्षा व्यक्त केली. नागरी सोशल फाऊंडेशनच्या शिक्षण विभागाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'संपूर्ण वंदे मातरम गायन' स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात खासदार कुलकर्णी बोलत होत्या. या कार्यक्रमाला महापौर मंजुषा नागपुरे, वंदे मातरमचे अभ्यासक मिलिंद सबनीस, नागरिक सोशल फाऊंडेशनचे विश्वस्त अमेय सप्रे, स्पर्धेच्या समन्वयक डॉ. शीतल गोडबोले, स्मिता देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेला विद्यार्थी,,पालक आणि शाळांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, सहाशेहून अधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

### जगदंब प्रतिष्ठानच्या रक्तदान शिबिरात ३१५ बाटल्यांचे संकलन

जुन्नर (आरंभ पर्व) : जुन्नर येथील जगदंब प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास रक्तदात्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ३१५ रक्तदात्यांनी रक्तदान केले असल्याची माहिती अध्यक्ष विनायक गोसावी यांनी दिली. शिबिराचे उद्घाटन पंचायत समिती सदस्य संजय वऱ्हाडी, नगरसेवक अनिल रोकडे, नरेंद्र तांबोळी, माजी नगरसेवक मधुकर काजळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष धनराज खोत, लायन्स क्लबचे विश्वास भालेकर, ग्रामपंचायत सदस्य जितेंद्र कबाडी,सुनील जाधव, अरुण मोरे, शिवराज संगनाळे, सागर कुऱ्हे आदी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

### खडकुंबे शाळेत रंगली लोकशाहीची रियल निवडणूक

जुन्नर (आरंभ पर्व) : आदिवासी भागातील खडकुंबे ता.जुन्नर येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेत ईव्हीएम च्या मदतीने बालसंसदेची रियल निवडणूक संपन्न झाली. शाळेतील विद्यार्थ्यांना मतदानाचा अधिकार, निवडणूक प्रक्रिया आणि नागरिक म्हणून जबाबदाऱ्यांची प्रत्यक्ष ओळख व्हावी या उद्देशाने लोकशाही निवडणूक प्रक्रियेचे वास्तवदर्शी प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. या निवडणुकीत शाळेच्या मुख्यमंत्रीपदी श्रेयस रामदास सरोगदे आणि उपमुख्यमंत्री पदी रुद्र तानाजी मुकणे निवडून आले.

# आंबेगावात तीन गावठी पिस्तुले जप्त; तिघांना अटक

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांची धडाकेबाज कारवाई



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आंबेगाव परिसरात गावठी अग्निशस्त्र घेऊन फिरणाऱ्या तिघांना आंबेगाव पोलिसांनी सापळा रचून अटक केली. आरोपींकडून तब्बल १ लाख २० हजार ५०० रुपये किमतीची तीन गावठी अग्निशस्त्रे आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईमुळे परिसरातील अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर पोलिसांचा वचक निर्माण झाला आहे.

दिनांक १० ऑगस्ट रोजी आंबेगाव पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, जांभुळवाडी पाझर तलावाशेजारील मोकळ्या जागेत, जांभुळवाडी रोड, शनिनगर, आंबेगाव खुर्द येथे तीन व्यक्ती थांबले असून त्यांच्याकडे अग्निशस्त्रे आहेत. माहिती मिळताच वरिष्ठांच्या आदेशानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांनी कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक महेश नायकवडी आणि पोलीस उपनिरीक्षक युवराज शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकाने घटनास्थळी सापळा रचला. पोलिसांनी संशयित तिघांना शिताफीने ताब्यात घेत त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे तीन गावठी अग्निशस्त्रे आणि एक जिवंत काडतूस आढळून आले.

पोलिसांनी राजन विनोद शहा, अनिल कैलास चौधरी आणि प्रथम अरुण रेणुसे या तिघांना अटक केली आहे. आरोपींविरुद्ध आंबेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३४१/२०२६ अन्वये भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३(२५) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(२)(३) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना न्यायालयाने १४ ऑगस्ट २०२६पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सहआयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त मिलिंद मोहिते आणि सहायक पोलीस आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने, पोलीस निरीक्षक (गुन्हे) चांगदेव सजगणे, सहायक पोलीस निरीक्षक महेश नायकवडी, पोलीस उपनिरीक्षक युवराज शिंदे आणि त्यांच्या पथकाने केली.

अवैध अग्निशस्त्रांविरोधात आंबेगाव पोलिसांनी सुरू केलेल्या कारवाईमुळे परिसरातील गुन्हेगारी प्रवृत्तींना मोठा धक्का बसला असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांची कारवाई अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

> अग्निशस्त्रविरोधी कारवाईला वेग देण्यात आला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे जांभुळवाडी परिसरात सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून तीन गावठी अग्निशस्त्रे आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. परिसरात बेकायदा अग्निशस्त्रे बाळगणाऱ्यांवर करडी नजर आहे. अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार आहेत.
>
> **- मा. श्री. शरद झिने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक आंबेगाव पोलीस स्टेशन पुणे शहर**

## नवले मनपा शाळेमध्ये क्रांती दिन उत्साहात साजरा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

क्रांती दिनानिमित्त 156b नवले मनपा शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे नियोजन अनिता शितोळे यांनी अतिशय कल्पकतेने केले. इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील तसेच समाजसुधारणेतील थोर व्यक्तिमत्त्वांच्या वेशभूषा साकारून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, प्रीतिलता वड्डेदार, डॉ. आनंदीबाई जोशी, राणी लक्ष्मीबाई, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, लोकमान्य टिळक, चाचा नेहरू, महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आदी महापुरुष व थोर व्यक्तिमत्त्वांच्या वेशभूषा साकारल्या. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांच्या गटासाठी संध्या चांदगुडे व उर्मिला दराडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले, तर इयत्ता पाचवी ते सातवीच्या गटासाठी रेश्मा नवले व गणेश पतंगे यांनी परीक्षकाची भूमिका पार पाडली. दोन्ही गटांतून प्रथम तीन क्रमांक तसेच दोन उत्तेजनार्थ क्रमांक निवडण्यात आले. यावेळी विजय कदम यांनी आपल्या दमदार आवाजात क्रांती दिनाचा इतिहास आणि स्वातंत्र्यलढ्यातील विविध घटनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण झाली. कार्यक्रमादरम्यान 'इन्कलाब जिंदाबाद', 'भारत माता की जय' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

## येरवडा खुले कारागृहात ध्यान-धारणा कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

येरवडा खुले कारागृहातील बंद्यांच्या मानसिक शांततेसह सकारात्मक विचारसरणी, आत्मिक समाधान आणि आध्यात्मिक विकासाला चालना देण्यासाठी माहेर महिला प्रतिष्ठान आणि मैत्री बोध परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. ८ ऑगस्ट) विशेष 'ध्यान व शक्ती प्रवाह' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सायंकाळी ४ ते ६ या वेळेत झालेल्या या कार्यक्रमाला बंदी तसेच कारागृहातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि पुणे विभागाचे कारागृह उपमहानिरीक्षक सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. मैत्री बोध परिवारचे संस्थापक प्रेमावतार मैत्रेय दादाश्रीजी यांच्या मार्गदर्शनाखाली दोन तासांचे ध्यानसत्र घेण्यात आले. या सत्रामध्ये उपस्थितांना 'लोका लाइट' तसेच दैवी शक्ती क्रियेचा अनुभव देण्यात आला. सध्याच्या धकाधकीच्या आणि अस्थिर वातावरणात समाजात प्रेम, शांतता आणि सकारात्मकता वाढविण्यासाठी आध्यात्मिक उपक्रमांची गरज असल्याचे यावेळी संस्थापकांनी सांगितले.

यावेळी बंदीवानांशी संवाद साधताना येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी प्रसिद्ध सुभाषिताचा दाखला देत आत्मज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले, "नाना शास्त्र पठेन् लोका, नाना दैवत पूजनम्। आत्मज्ञान विना पार्थ, सर्व कर्म निरर्थकम्।।"

माहेर महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा विद्या म्हात्रे, उपाध्यक्षा निकीता लोकरे आणि सचिव डॉ. मीना सत्यशील बागे यांच्या विशेष पुढाकाराने हा उपक्रम पार पडला. कार्यक्रमाला मेघा नाईक, शैलेश नाईक, संगीता सौंदणकर, अजय देशमुख, रुद्रमुनी हुबलीमठ, संतोष सूर्यवंशी, रूपेश अ. मधमशेट्टीवार, संदीप अग्रवाल आणि हर्षल चव्हाण यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी निशा श्रेयकर, तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे, सुभेदार दत्तात्रय चव्हाण, सुनील गायकवाड, चंद्रकांत खांदवे, हवालदार वैशाली थोरात, लता पिसे, शिपाई शैला कदम, सरला साबळे, संध्या जाधवर, सुरेखा म्हात्रे, मिसबा सय्यद, मिश्रक अभिषेक रौंदळ, अशोक होले, राकेश पवार, मोहसीन जमादार, याकूब शेख यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने बंदी उपस्थित होते. बंदींच्या सुधारणा, पुनर्वसन आणि सर्वांगीण विकासासाठी येरवडा खुले कारागृह प्रशासनाकडून विविध सकारात्मक व विधायक उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या ध्यान-धारणा कार्यक्रमामुळे बंद्यांना मानसिक शांतता आणि सकारात्मक ऊर्जेचा अनुभव मिळाला.

*नागेश चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त हंकारे यांच्या 'बाप समजून घेताना'*

## व्याख्यानाने जवळगावमध्ये विद्यार्थी भावूक



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सोलापूर जिल्हा सरचिटणीस, नागेश चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त दत्तगुरु शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने 'बाप समजून घेताना' या विशेष व्याख्यानाचे आयोजन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जवळगाव नं. २ येथे करण्यात आले होते. प्रसिद्ध व्याख्याते प्रा. वसंत हंकारे यांच्या मधुर वाणीतील प्रभावी विचारांनी उपस्थित विद्यार्थी भावूक झाले. प्रारंभी राष्ट्रवादी काँग्रेस चे नेते नवाज मुलानी यांनी प्रतिमेचे पूजन केले. प्रा. वसंत हंकारे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत आई-वडिलांचे प्रेम, वडिलांचा संघर्ष, मुलांच्या भवितव्यासाठी वडील घेत असलेले कष्ट आणि त्याग यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली. त्यांच्या मनाला भिडणाऱ्या विचारांनी अनेक विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. वडिलांच्या कष्टांची जाणीव करून देणारे हे व्याख्यान विद्यार्थ्यांच्या मनावर कायमस्वरूपी ठसा उमटवून गेले.

या कार्यक्रमाचे आयोजन सोमनाथ चव्हाण यांनी केले होते. वाढदिवसानिमित्त सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांची जाणीव करून देण्याचा हा उपक्रम विशेष ठरला. यावेळी बोलताना नागेश चव्हाण यांनी समाजासाठी काहीतरी चांगले आणि विधायक कार्य करण्याचा मानस व्यक्त केला. जनतेच्या प्रश्नांसाठी आणि समाजाच्या विकासासाठी यापुढेही कटिबद्ध राहून काम करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. कार्यक्रमास अभिमन्यू चव्हाण, अक्षय चव्हाण, नेताजी गांधले, चंद्रकांत ढेंगळे, रितेश कापसे, बळीराम कापसे, अक्षय कापसे, नवाज मुलानी, मुजमेल पठाण, काकासाहेब ढेंगळे, आंबऋषी कापसे, ज्ञानेश्वर कापसे, सुमित आडसूळ, अशोक कापसे, बालाजी वीर, अमोल कापसे शशिकांत बाप्पा कापसे धनाजी डिसले मधुकर चव्हाण सुनील जानकर बालाजी विर काका चव्हाण दत्ता कापसे दत्तात्रय काकडे नानासाहेब ढेंगळे सोनदेव कापसे, समाधान ढेंगळे,बालाजी कापसे बाबासाहेब मोटे नारायण जाधव व इतर मान्यवर, शिक्षक ग्रामस्थ पालक उपस्थित होते. भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सोमनाथ चव्हाण यांनी केले.

## 'बंधन कॉन्ट्रा फंड'ची सुरुवात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बंधन म्युच्युअल फंडाने 'बंधन कॉन्ट्रा फंड' या नव्या खुल्या स्वरूपाच्या समभाग गुंतवणूक योजनेची घोषणा केली आहे. बाजारातील प्रचलित प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन मूलभूतदृष्ट्या सक्षम, मात्र तात्पुरत्या कारणांमुळे दुर्लक्षित झालेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणुकीच्या संधी शोधणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

या नव्या निधी प्रस्तावाची सुरुवात १० ऑगस्ट २०२६ रोजी होणार असून, २४ ऑगस्ट २०२६ रोजी तो बंद होईल. अधिकृत म्युच्युअल फंड वितरक, ऑनलाइन गुंतवणूक माध्यमे तसेच बंधन म्युच्युअल फंडाच्या संकेतस्थळाद्वारे या योजनेत थेट गुंतवणूक करता येणार आहे.

बंधन कॉन्ट्रा फंड अशा कंपन्यांची निवड करण्याचा प्रयत्न करेल, ज्या क्षेत्राशी संबंधित चिंता, चक्राकार आव्हाने, व्यापक आर्थिक अनिश्चितता किंवा बाजारातील नकारात्मक वातावरणामुळे सध्या दुर्लक्षित ठरत आहेत. मात्र, त्यांच्या व्यवसायाची मूलभूत स्थिती आणि कमाईची क्षमता सुधारल्यास भविष्यात त्यांच्या बाजारमूल्यात वाढ होण्याची शक्यता आहे.

या योजनेच्या शुभारंभाविषयी बोलताना बंधन एएमसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल कपूर म्हणाले की, विविध क्षेत्रांमधील मूल्यांकनातील तफावत वाढल्याने निवडक कॉन्ट्रारियन गुंतवणुकीसाठी संधी निर्माण झाल्या आहेत.

## कायमस्वरूपी उपाययोजनांसाठी तातडीची बैठक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोड परिसरातील निंबजनगर, विठ्ठलनगर आणि एकतानगरी या भागांमध्ये दरवर्षी पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पुराच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महापौर मंजुषा नागपुरे यांनी संबंधित प्रशासकीय, तांत्रिक तसेच पाटबंधारे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावून सविस्तर आढावा घेतला. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत तातडीच्या उपाययोजनांसह दीर्घकालीन नियोजन करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीत निंबजनगर, विठ्ठलनगर आणि एकतानगरी परिसरातील पूरपरिस्थितीची कारणे, बाधित क्षेत्रांचे नकाशे, नदीपात्रातील अडथळे, पाण्याच्या प्रवाहातील अडचणी, संरक्षण भिंतींची आवश्यकता तसेच भविष्यात पूरस्थितीची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या अभियांत्रिकी उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली.

## 'अजितदादा पवार सार्वजनिक वाचनालयाचे' उद्घाटन



**जवळगाव (दै. आरंभ पर्व)**

दत्तगुरु शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस नागेश चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त जवळगाव येथे 'लोकनेते स्वर्गीय अजितदादा पवार सार्वजनिक वाचनालयाचे' उद्घाटन प्रसिद्ध व्याख्याते प्रा. वसंत हंकारे यांच्या हस्ते करण्यात आले. नागेश चव्हाण यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या वाचनालयात विविध विषयांवरील पुस्तके, प्रबोधनात्मक साहित्य तसेच विविध नियतकालिके नागरिकांना मोफत वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थी, युवक आणि नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाचा प्रसार व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

उद्घाटनप्रसंगी प्रा. वसंत हंकारे यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित करत "प्रत्येकाने वाचन केले पाहिजे. वाचनामुळे ज्ञान वाढते, विचार समृद्ध होतात आणि समाजाला योग्य दिशा मिळते," असे प्रतिपादन केले.

यावेळी अभिमन्यू चव्हाण, काकासाहेब ढेंगळे, नारायण जाधव, अंबऋषी कापसे, संतोष पवार, चंद्रकांत ढेंगळे, समाधान ढेंगळे, दत्तात्रय कापसे, नितीन कापसे, अरुण नाना कापसे, धनाजी डिसले, नेताजी गांधले, अक्षय कापसे, सुनील जाडकर, मधुकर चव्हाण, अशोक कापसे, शिवाजी कोळी, संतोष ढेगळे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. तसेच पी एस आय वडने साहेब, कोलते साहेब, पटणे साहेब, विनोद वाघमारे, दिनेश पाटील, विनोद झेंडे यांचीही उपस्थिती होती. वाचनालयाच्या माध्यमातून गावातील नागरिक आणि विद्यार्थ्यांना ज्ञानाचे दालन खुले झाले असून, या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पुढाकार घ्यावा : ॲड. वंदना चव्हाण

पुणे (आरंभ पर्व) : भारताच्या लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकसंख्या ही तरुणांची आहे. तरुणांनी ठरवले, तर ते काहीही करु शकतात. येत्या काळात तरुणांनी पर्यावरणाशी निगडीत समस्या लक्षात घेऊन सामाजिक दायित्वाच्या भावनेतून पर्यावरण विषयात काम करायला हवे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी दूत म्हणून काम करावे," असे मत माजी खासदार ॲड. वंदना चव्हाण यांनी व्यक्त केले. सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंट अँड ॲक्टीव्हीटीज (सीवायडीए) यांच्यातर्फे जागतिक युवा दिनाच्या (१२ ऑगस्ट) निमित्ताने 'ग्रीन युथ मूव्हमेंट'चे उद्‌घाटन करताना त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर तेरे देस होम्सच्या डॉ. नम्रता जैटली, नगरसेवक ॲड. अविनाश साळवे, नगरसेविका सुमय्या नदाफ, सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंट अँड ॲक्टीव्हीटीजचे संस्थापक संचालक मॅथ्यू मट्टम आदी उपस्थित होते. ॲड. वंदना चव्हाण म्हणाल्या, "शहरात पूर्वी भर उन्हाळ्यातही फॅनची गरज लागत नव्हती. आता मात्र एसीशिवाय बसवत नाही. आता थोडा पाऊस झाला, तरी शहरात पूरस्थिती निर्माण होते. जागतिक तापमानवाढ आणि पर्यावरणाचा दिवसेंदिवस ऱ्हास होत असल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे शहरांमध्ये कार्बन डायऑक्साईडडचे उत्सर्जन वाढत आहे. आता याकडे दुर्लक्ष केले, तर येणाऱ्या पिढीला दप्तरात वह्या-पुस्तकांसोबत ऑक्सिजन सिलेंडर घेऊन फिरावे लागेल."

### रिटेल कौशल्यांचे करिअरमध्ये रूपांतर

पुणे (आरंभ पर्व) : अनेक तरुणांसाठी करिअर घडवण्याची सुरुवात कार्यस्थळावर आत्मविश्वासाने पाऊल ठेवणे, ग्राहकांशी संवाद साधणे आणि स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवण्यापासून होते. सांगलीतील सोहेल समीर सौदागर याच्यासाठी हा आत्मविश्वास ग्राहकांशी संवाद साधणे आणि उत्पादनांची माहिती समजावून सांगणे शिकल्यामुळे आला. छत्रपती संभाजीनगरमधील पंडित कृष्ण गजानन याच्यासाठी तो घराजवळ कायमस्वरूपी नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि अनुभव मिळवल्यामुळे आला. शर्मा सर्वेश अवधेश, विशाल सिद्धार्थ अरक, दाऊद रईस खान, सार्थक गाडगिल आणि प्रितिश सुनील भोसले यांच्यासाठी उत्पादनाचे ज्ञान, संवाद कौशल्य, ग्राहकांशी संवाद आणि उत्पादनाचे प्रात्यक्षिक देण्याची कौशल्ये अधिक मजबूत केल्यामुळे रिटेल शॉप फ्लोअरवर त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. Samsung DOST हा Samsung India चा CSR कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम तरुणांना रिटेल क्षेत्रातील फ्रंटलाइन करिअरसाठी उद्योगाशी संबंधित प्रशिक्षण कौशल्ये आणि कार्यस्थळाचा व्यावहारिक अनुभव प्रदान करतो. या कार्यक्रमाने संपूर्ण भारतातील 19,000 हून अधिक तरुणांना सक्षम केले असून, करिअरच्या संधी निर्माण करण्यासोबतच भारत सरकारच्या Skill India Mission ला देखील पाठिंबा दिला आहे. हे सात तरुण व्यावसायिक भारतभरातील Samsung DOST Sales अंतर्गत 9,400 हून अधिक प्रशिक्षणार्थींमधून निवडलेल्या 30 सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांमध्ये समाविष्ट आहेत.



### यशवंत घारपुरे यांना 'डीएसटीए'चा विशेष पुरस्कार

पुणे (आरंभ पर्व) : दी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीज् असोसिएशनच्या (डीएसटीए) नुकत्याच पार पडलेल्या ७१ व्या वार्षिक अधिवेशनात हिंदुस्थान अँटीबायोटिक्सचे माजी व्यवस्थापकीय संचालक यशवंत घारपुरे यांना 'डीएसटीए' विशेष गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्याचे माजी गृह व अर्थमंत्री जयंत पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सेनापती बापट रस्त्यावरील हॉटेल जेडब्ल्यू मॅरियटमध्ये येथे हा कार्यक्रम पार पडला. उद्योग, तंत्रज्ञान व व्यवस्थापन क्षेत्रातील प्रदीर्घ आणि उल्लेखनीय योगदानाबद्दल यशवंत घारपुरे यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमावेळी माजी मंत्री राजेश टोपे व दिलीप देशमुख, राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, माजी आयएएस अधिकारी डॉ. शेखर गायकवाड, कर्नाटकचे माजी मंत्री श्रीमंत पाटील, 'डीएसटीए'चे अध्यक्ष सोहन शिरगावकर आदी उपस्थित होते. यशवंत घारपुरे हे 'डीएसटीए'सह गेल्या सात दशकांपासून विविध क्षेत्रात कार्यरत असून, त्यांनी रिसर्च आणि डेव्हलपमेंट संशोधक, शिफ्ट इंजिनिअर, सिनियर केमिकल इंजिनिअर, प्रोजेक्ट मॅनेजर, जनरल मॅनेजर अशा विविध पदांवर काम केलेले आहे. याबरोबरच घारपुरे यांनी विविध विषयांवर ३०० लेख लिहीले आहेत. याशिवाय त्यांच्या व्हॉलेंटरी एक्सिक्युटीव्ह फोरम ऑफ इंडिया आणि सर्व्हीसेस ऑफ रिटायर्ड एक्सिक्युटीव्ह अँड टेक्नॉलॉजी ट्रान्सफर असोसिएशन अशा दोन स्वयंसेवी संस्था आहेत. केमिकल इंजिनिअरींगच्या क्षेत्रात घारपुरे यांनी भरीव काम केले असून, त्यांनी अनेक जागतिक प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केले आहेत. त्यांच्या या कार्याचा इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ केमिकल इंजिनिअर्स, पुणे शाखा आणि राष्ट्रीय स्तरावरुन विशेष गौरव करण्यात आला आहे. तसेच लक्ष्मीनारायण इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नालॉजी यांच्याकडून यशस्वी माजी विद्यार्थी म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

### हवेली तालुका क्रीडा शिक्षक संघटनेच्या अध्यक्षपदी महाडीक

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : हवेली तालुका क्रीडा शिक्षक संघटनेच्या अध्यक्षपदी एंजल हायस्कूलचे क्रीडा विभाग प्रमुख भाऊसाहेब महाडिक यांची अध्यक्षपदी तर जोगेश्वरी माता माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख सूर्यकांत क्षीरसागर यांची सचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली क्रीडा व युवक सेवा संचालनाही महाराष्ट्र राज्य व पुणे जिल्हा क्रीडा परिषद च्या वतीने हवेली तालुका क्रीडा शिक्षकांची वार्षिक बैठक जोगेश्वरी माता माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय या ठिकाणी हवेली तालुका क्रीडा शिक्षण समिती कार्यकारिणीची निवड झाली. हवेली तालुका क्रीडा शिक्षण संघटनेचे माजी अध्यक्ष रोहिदास भाडळे यांचा दोन वर्षाचा कार्यकाळ संपल्याने यांची पदोन्नती होऊन पुणे जिल्हा शारीरिक शिक्षक संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाली.नव्याने हवेली तालुका क्रीडा शिक्षक संघटनेच्या सर्वानमते कार्यकारिणीची करण्यात आली.

# डिजिटल दंतचिकित्सा आणि इम्प्लांटचे आधुनिक केंद्र सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एम. ए. रंगूनवाला कॉलेज ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च सेंटरमध्ये 'अबेदा इनामदार सेंटर ऑफ इम्प्लांटोलॉजी अँड डिजिटल डेंटिस्ट्री' सुरू करण्यात आले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने दंतशिक्षण आणि रुग्णांवरील उपचार अधिक चांगले करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे. या केंद्रात विद्यार्थ्यांना आधुनिक दंतचिकित्सा तंत्रज्ञान शिकण्याची आणि त्याचा प्रत्यक्ष सराव करण्याची संधी मिळणार आहे.

एमसीई सोसायटीच्या अध्यक्षा श्रीमती अबेदा इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली हे केंद्र उभारण्यात आले आहे. भविष्यात दंतचिकित्सेमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आणखी वाढणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेतानाच या नवीन तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, हा केंद्राचा मुख्य उद्देश आहे.

यावेळी श्रीमती अबेदा इनामदार म्हणाल्या, "व्हर्च्युअल पेशंट तंत्रज्ञानामुळे प्रत्यक्ष उपचार सुरू करण्यापूर्वीच संपूर्ण उपचाराचे नियोजन करता येते. उपचारानंतर होणारा बदलही आधी पाहता येतो. त्यामुळे उपचार अधिक सुरक्षित आणि अचूक होऊ शकतात. रुग्णांना वारंवार हॉस्पिटलमध्ये येण्याची गरजही कमी होऊ शकते. विद्यार्थ्यांना चांगले दंतशिक्षण देणे आणि समाजाला उत्तम दंतसेवा उपलब्ध करून देणे ही या केंद्राची प्रमुख उद्दिष्टे आहेत."



त्या पुढे म्हणाल्या, "पारंपरिक दंतचिकित्सा आणि वेगाने बदलणारे डिजिटल तंत्रज्ञान यांना एकत्र आणण्यासाठी हे केंद्र तयार करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना दातांच्या आजारांचे निदान, उपचारांचे नियोजन, दंत इम्प्लांट आणि कृत्रिम दात तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव येथे मिळेल. या प्रकल्पाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत डॉ. परवेज इनामदार यांनी केलेले मार्गदर्शन आणि सहकार्य अत्यंत महत्त्वाचे ठरले."

> इम्प्लांट उपचारांसाठी सीबीसीटी स्कॅनिंग आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा एकत्रित वापर केला जाणार आहे. त्यामुळे इम्प्लांट नेमका कुठे आणि कसा बसवायचा, याचे आधीच अचूक नियोजन करता येईल. कठीण उपचारांच्या वेळी रुग्णांना अधिक आराम आणि सुरक्षितता मिळावी यासाठी विशेष सुविधाही उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या केंद्रामुळे एम. ए. रंगूनवाला कॉलेजने आधुनिक डिजिटल दंतशिक्षणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण देऊन भविष्यात अधिक कुशल दंतवैद्य तयार करणे, तसेच रुग्णांना अधिक सुरक्षित आणि अचूक उपचार देणे हा या केंद्राचा उद्देश आहे.

महाविद्यालयाच्या प्राचार्या आणि प्रोस्थोडॉन्टिक्स व इम्प्लांटोलॉजी विभागाच्या प्रमुख डॉ. रामनदीप दुगल यांनी सांगितले की, अनेक वर्षांच्या नियोजनानंतर हे केंद्र उभे राहिले आहे.

हे केंद्र उभारण्यासाठी प्रभारी प्राचार्य आणि कन्झर्व्हेटिव्ह डेंटिस्ट्री व एंडोडॉन्टिक्स विभागाचे प्रमुख डॉ. विवेक हेगडे आणि प्रोस्थोडॉन्टिक्स विभागाच्या प्रभारी प्रमुख डॉ. स्मिता मुसानी यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. डॉ. मोहित खेर यांच्या नेतृत्वाखाली या केंद्रात डिजिटल दंतचिकित्सा आणि इम्प्लांट क्षेत्रातील शिक्षण, उपचार आणि संशोधन केले जाणार आहे.

केंद्रात विद्यार्थ्यांना डिजिटल पद्धतीने उपचारांचे नियोजन, इम्प्लांट उपचार, डिजिटल स्माइल डिझाइन आणि आधुनिक दंत प्रयोगशाळेतील तंत्रांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

येथे तोंडाच्या आतील भागाचे स्कॅनिंग करणारे स्कॅनर, ३डी फेस स्कॅनर, सीबीसीटी, कॅड/कॅम यंत्रणा आणि डिजिटल डिझाइन सॉफ्टवेअर यांसारख्या आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. या तंत्रज्ञानामुळे रुग्णाच्या दातांची तपासणी करण्यापासून ते उपचारांचे नियोजन आणि कृत्रिम दात तयार करण्यापर्यंत अनेक कामे डिजिटल पद्धतीने करता येतात. त्यामुळे उपचार अधिक अचूक होण्यास आणि वेळ वाचण्यास मदत होते.

केंद्रात स्वतंत्र डिजिटल डेंटिस्ट्री लॅब तयार करण्यात आली आहे. येथे पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थी, इंटर्न तसेच शिक्षकांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. याशिवाय ३डी प्रिंटिंग लॅबही विकसित केली जात आहे. या लॅबमध्ये उपचार आणि शस्त्रक्रियेसाठी आवश्यक विविध मॉडेल्स आणि रुग्णाच्या गरजेनुसार दंत उपकरणे तयार करता येणार आहेत.

# खडकवासला धरणाची साठवण क्षमता पूर्ववत करा

## पुण्याची जलसुरक्षा बळकट करण्याची खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांची केंद्र सरकारकडे मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहर आणि लगतच्या परिसराच्या पाणीपुरवठ्याचा प्रमुख आधार असलेल्या खडकवासला धरणाची घटलेली साठवण क्षमता हा गंभीर आणि दीर्घकालीन प्रश्न आहे. धरणाची साठवण क्षमता पुनर्संचयित करण्यासाठी केंद्र सरकारने संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केली. राज्यसभेतील विशेष उल्लेखाद्वारे त्यांनी या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले. खडकवासला धरणाची मूळ साठवण क्षमता सुमारे ३.७५ टीएमसी होती. मात्र, गेल्या अनेक दशकांपासून साचलेल्या गाळामुळे धरणाची प्रभावी साठवण क्षमता निम्म्यापेक्षा अधिक घटली असून, ती सध्या जवळपास १.७५ टीएमसी इतकी राहिल्याचे डॉ. कुलकर्णी यांनी नमूद केले. साठवण क्षमतेत झालेल्या या मोठ्या घटीमुळे पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी साठवून ठेवण्याची तसेच पावसाळ्यानंतर वाढती शहरी पाण्याची गरज भागविण्याची धरणाची क्षमता कमी झाली आहे. पुणे हे वेगाने विस्तारत असलेले महानगर असून, पिण्याचे पाणी, उद्योग, सार्वजनिक सेवा आणि पर्यावरणीय गरजांसाठी भविष्यात पाण्याची मागणी आणखी वाढणार आहे. विशेषतः अपुऱ्या पावसाच्या वर्षांत घटलेली जलसाठवण क्षमता जलव्यवस्थापन यंत्रणेवर मोठा दबाव निर्माण करू शकते. त्यामुळे पुण्याच्या दीर्घकालीन जलसुरक्षेसह सध्याच्या जलसाठवण आणि वितरण व्यवस्थेच्या क्षमतेचा गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. खडकवासला जलाशयाची साठवण क्षमता वाढविण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने गाळ काढणे, पाणलोट क्षेत्रात उपचारात्मक कामे करणे, गाळ व्यवस्थापन, जलाशयाचे आधुनिकीकरण आणि प्रभावी जल अंदाजपत्रक तयार करणे यांसारख्या उपाययोजनांचा संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने अभ्यास करावा, अशी मागणी डॉ. कुलकर्णी यांनी केली.




खडकवासला जलाशय प्रणालीचे सर्वंकष मूल्यमापन करून तिची भविष्यातील शाश्वतता निश्चित करणे आवश्यक आहे. पुणे शहरातील लाखो नागरिकांची जलसुरक्षा, शहरी विकास, सार्वजनिक आरोग्य आणि आर्थिक विकास यांच्याशी हा प्रश्न थेट संबंधित आहे. त्यामुळे आजच योग्य उपाययोजना केल्यास भविष्यात उद्भवणारे मोठे जलसंकट टाळता येईल, असेही डॉ. कुलकर्णी यांनी विशेष उल्लेखात स्पष्ट केले.

# हडपसर-उरुळीकांचन रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करा

**उरुळीकांचन (दै. आरंभ पर्व)**

पुणे-सोलापूर महामार्गावरील हडपसर ते उरुळीकांचन मार्गाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या मार्गाची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी पंचायत समिती हवेलीचे सभापती युवराज काकडे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे. हडपसर-उरुळीकांचन मार्गावर अनेक ठिकाणी रस्त्याचा पृष्ठभाग खराब झाला आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालकांना त्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने खराब रस्त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्याही गंभीर झाली आहे.




- पंचायत समिती हवेलीचे सभापती युवराज काकडे यांची राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व एमएसआयडीसीकडे मागणी

दरम्यान, या मार्गावर महाराष्ट्र नैसर्गिक वायू लिमिटेडच्या गॅस पाइपलाइनच्या कामामुळे रस्त्याच्या कडेला असलेला भागही मोठ्या प्रमाणात खराब झाला आहे. त्यामुळे दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना घडत असल्याचे काकडे यांनी सांगितले.

# व्यक्तिमत्व विकासासाठी वाचन आवश्यक

## ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

वाचन ही समृद्ध करणारी गोष्ट असून सकस, समृद्ध वाचनाने माणसाचा सर्वांगीण विकास होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी गांभीर्याने वाचन करावे असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचनसंस्कृतीच्या प्रचार आणि प्रसारासाठी आयोजित 'पुस्तक भेट' उपक्रमात बोलत होते.

या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, डॉ. श्वेतांबरी मांडे, डॉ. सागर थेऊरकर, प्रा. वैभवी कोपर्डे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले, की आयुष्याच्या विविध टप्प्यांवर पुस्तके ही मार्गदर्शक असतात. पुस्तक वाचनाने एकाग्रता वाढते. स्मरणशक्ती व कल्पनाशक्ती विकसित होते.

# संपत्ती निर्मितीच्या पलीकडे : निवृत्ती नियोजनात उत्पन्नावरही लक्ष केंद्रित करणे गरजेचे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अलीकडच्या काळात भारतात ' फायर' (आर्थिक स्वातंत्र्य, लवकर निवृत्ती) ही संकल्पना कॉर्पोरेट बैठका, सोशल मीडिया आणि संपत्तीविषयक अनौपचारिक चर्चांमध्ये मोठ्या प्रमाणावर चर्चेत आहे. प्रत्येकजण त्या एका 'जादुई आकड्याच्या' शोधात आहे – म्हणजेच अशा एका मोठ्या निधीच्या शोधात, जो निवृत्तीनंतरच्या काळात धावपळीचे आयुष्य मागे पडलेले असेल, तेव्हा सुरक्षित आणि सुखकर जीवन जगण्याची हमी देईल. त्या अपेक्षित निधीच्या उद्दिष्टावर लक्ष केंद्रित करणे समजण्यासारखे आहे. अर्थात, अंतिम आकडा हा प्रत्येकाची जीवनशैली, आरोग्य आणि इतर गरजांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असेल. ही एक मूर्त आणि सहजपणे मागोवा घेता येण्यासारखी बाब आहे. परंतु, ती अपूर्णही आहे. ॲक्सिस मॅक्स लाइफ इन्शुरन्स लिमिटेडमध्ये



'पार्टनरशिप चॅनल्स'चे मुख्य व्यवसाय अधिकारी आणि 'निवृत्ती' विभागाचे प्रमुख अनुराग गुप्ता म्हणाले की, मागील काही वर्षांत भारतीयांमध्ये निवृत्ती नियोजनाबाबतची जागरूकता वाढली आहे. परंतु, त्याचे रूपांतर पुरेशा तयारीत झालेले नाही. निवृत्तीच्या तयारीबाबतच्या एका अलीकडील उद्योग अहवालानुसार सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी केवळ ३७ टक्के लोकांनीच त्यांच्या निवृत्तीसाठीच्या नियोजित निधीपैकी किमान एक चतुर्थांश निधी जमा केला होता; तसेच, दहापैकी सात जणांचा अजूनही असा विश्वास होता की १ कोटी रुपयांचा निधी पुरेसा ठरेल — मात्र वाढता खर्च आणि वाढलेले आयुर्मान पाहता ही रक्कम अपुरी पडण्याचीच शक्यता आहे.

> अनेक सेवानिवृत्तांसाठी आर्थिक नियोजन हे केवळ त्यांच्या स्वतःच्या आरामापुरते मर्यादित नसते, तर ते आपल्यामागे काय सोडून जाणार आहेत याचाही त्यात समावेश असतो. कुटुंबे स्वतःच्या उत्पन्नाच्या सुरक्षिततेशी तडजोड न करता, संपत्तीची रचनाबद्ध पद्धतीने पुढील पिढीकडे हस्तांतरित करण्याचा विचार करत असल्यामुळे, वारसा नियोजनाचे महत्त्व वाढले आहे. आयुष्यभराचे स्थिर उत्पन्न आणि एक अर्थपूर्ण वारसा या परस्परविरोधी गोष्टी नाहीत. परंतु दोन्ही साध्य करण्यासाठी नंतरचा विचार न करता जाणीवपूर्वक नियोजन करणे आवश्यक आहे.


संशोधनात असेही आढळून आले की, निवृत्तीनंतर आपली बचत दहा वर्षांहून अधिक काळ पुरेल, असा विश्वास केवळ एक-तृतीयांश प्रतिसादकर्त्यांनाच होता. उद्देश आणि प्रत्यक्ष कृती यांमधील ही तफावत हेच देशासमोरील निवृत्तीविषयक जोखमीचे मुख्य कारण आहे. निवृत्ती नियोजनाची पद्धत आता केवळ बचत, उत्पन्न किंवा संरक्षण यांसारख्या एकाच गरजेची पूर्तता करणाऱ्या स्वतंत्र उत्पादनांवर अवलंबून न राहता एकात्मिक दृष्टिकोनाकडे वळत आहे. त्यात संपत्ती निर्मिती, शाश्वत उत्पन्न, महागाईपासून संरक्षण, आपत्कालीन गरजांसाठी रोख उपलब्धता आणि वारसा नियोजन या सर्व बाबींचा एका सुसंगत आराखड्यात समावेश होतो.

# एजेंटिक स्केलला चालना : ॲडेसोचा पुणे आणि चेन्नईमध्ये विस्तार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

युरोपमधील आघाडीच्या माहिती-तंत्रज्ञान सेवा आणि सॉफ्टवेअर विकास क्षेत्रातील कंपनी ॲडेसो (adesso) ने पुणे आणि चेन्नई येथे आपल्या भारतीय कामकाजाचा धोरणात्मक विस्तार जाहीर केला आहे. 'एजेंटिक स्केल' या उपक्रमाअंतर्गत हा विस्तार करण्यात येत असून, जागतिक उद्योगांना डिजिटल क्षमता, बुद्धिमान स्वयंचलन आणि आधुनिक सॉफ्टवेअर विकासासाठी नवे तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याचा कंपनीचा उद्देश आहे.

जागतिक स्तरावर पारंपरिक खर्चकपात-आधारित परदेशी कामकाजाच्या पद्धतीऐवजी जागतिक क्षमता केंद्रे (ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स – जीसीसी) उभारण्याकडे उद्योगांचा कल वाढत आहे. या केंद्रांमधून संयुक्त नवोन्मेष, दुहेरी वितरण प्रणाली आणि संपूर्ण सॉफ्टवेअर विकास प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित (एजेंटिक एआय) तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे.




पुणे आणि चेन्नई येथील नव्या केंद्रांमुळे पुण्यातील उत्पादन अभियांत्रिकीतील कौशल्य आणि चेन्नईतील उद्योगांसाठी डेटा, कृत्रिम बुद्धिमत्ता व क्लाऊड आधुनिकीकरणातील क्षमता एकत्र आणली जाणार आहे. कोची येथील विद्यमान केंद्रासह देशभरात अत्याधुनिक तंत्रज्ञानातील कुशल मनुष्यबळाची साखळी उभारण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

ॲडेसो एसईचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क लोहवेबर म्हणाले, "भारतातील आमची कंपनी ही 'जागतिक विचार, स्थानिक कार्य' या धोरणाचे उत्तम उदाहरण आहे. पुणे आणि चेन्नई येथील नव्या नवोन्मेष केंद्रांमधून कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा क्षेत्रातील कौशल्य अधिक बळकट करून जागतिक ग्राहकांना स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्षम सेवा पुरविण्यात येतील."

जागतिक वितरण क्षमता अधिक प्रभावी करण्यासाठी ॲडेसो इंडिया कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित विकास चौकट आणि स्वयंचलित सॉफ्टवेअर प्रणालींचा वापर करत आहे. तर धोरण, व्यवस्थापन आणि गुणवत्ता हमी यांसारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या मानवी तज्ज्ञांकडेच राहणार आहेत. ॲडस्केल आणि स्मार्टशोअर एआय-आधारित जागतिक क्षमता केंद्र (SaGE) या कार्यपद्धतींच्या माध्यमातून उच्चस्तरीय सुरक्षा, डेटा संरक्षण आणि जलद सेवा पुरविण्यावर भर दिला जात आहे.

चेन्नई येथील वितरण मॉडेलचे यश आधीच सिद्ध झाले आहे. २०२५ पासून ॲडेसो एक्सासोल टेक हबचे संपूर्ण कामकाज सांभाळत असून, अवघ्या पाच महिन्यांत या केंद्राची क्षमता दुप्पट करण्यात आली आहे. ॲडेसो इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक प्रमोद मुरलीधरन म्हणाले, "पुणे आणि चेन्नई येथील कार्यालयांचे उद्‌घाटन हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आणि स्वयंचलित उद्योगव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करताना भारतातील आमची उपस्थिती अधिक मजबूत करण्यासाठी आम्ही कुशल मनुष्यबळ, तंत्रज्ञान क्षमता आणि नवोन्मेष व्यवस्थेत मोठी गुंतवणूक करत आहोत. ही केंद्रे उत्कृष्टता केंद्र म्हणून कार्य करून जागतिक ग्राहकांसाठी नाविन्यपूर्ण उपाय आणि दीर्घकालीन मूल्य निर्माण करतील." कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित बहु-एजंट प्रणाली आणि मानवी तज्ज्ञतेची सांगड घालत ॲडेसो जागतिक उद्योगांना अधिक वेगवान, सुरक्षित आणि परिणामकारक डिजिटल परिवर्तन साध्य करण्यास मदत करणार असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.